महाराष्ट्र विधानपरिषद

पहिले अधिवेशन, २०१५

तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

बुधवार, दिनांक ०८ एप्रिल, २०१५ / चैत्र १८, १९३७ (शके)

(१) मुख्यमंत्री
(२) गृहनिर्माण, खनिकर्म, कामगार मंत्री } **यांचे प्रभारी विभाग**

प्रश्नांची एकूण संख्या - ६२

आयआरबी कंपनीच्या विविध ठिकाणच्या कार्यालयावर केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) पथकाने टाकलेले छापे

(१) * २८६७ डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.आनंद ठाकूर, श्री.अमरसिंह पंडित, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाची बांधणी करणाऱ्या व या मार्गावरील जमिनी अवैध रित्या ताब्यात घेण्याचा आरोप असलेल्या आयआरबी कंपनीच्या २१ ठिकाणच्या कार्यालयावर केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सीबीआय) पथकाने दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास छापे टाकल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कंपनीच्या कार्यालयावर छापे मारण्याची कारणे काय आहेत, तसेच सदरील छाप्यात सीबीआय च्या पथकास काय आढळून आले,

(३) तसेच, उपरोक्त प्रकरणात दोषी आढळून येणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) प्रश्नात नमूद कंपनीच्या कार्यालयावर केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने टाकलेले छापे ही बाब राज्य शासनाच्या अखत्यारितील नसून केंद्र शासनाशी संबंधित आहे.
(३) व (४) उपरोक्त प्रकरणात दोषी आढळून आल्यास संबंधितांवर योग्यती कारवाई करण्यात येईल.

पुणे जिल्ह्यातील संरक्षण विभागाशी संबंधित प्रश्नांबाबत झालेल्या बैठकीबाबत

(२) * ३४१९ श्री.अनिल भोसले, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील संरक्षण विभागाशी संबंधित प्रश्नांबाबत मा.सरंक्षण मंत्री यांचे समवेत पर्यावरण मंत्री, जिल्हाधिकारी आणि पालिकेचे अधिकारी यांची माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात बैठक झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीत कोणते निर्णय घेण्यात आले आहेत,
(३) तसेच सदर निर्णयाची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.
(२) सदर बैठकीमध्ये, संरक्षण विभागाकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणांबाबत पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नियोजित विकास कामांसाठी संरक्षण विभागाच्या ताब्यात असलेल्या आवश्यक जमिनीबाबतचे प्रलंबित प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांच्यामार्फत संरक्षण मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्याच्या सुचना मा.संरक्षण मंत्री, भारत सरकार यांनी दिल्या आहेत.
(३) संरक्षण विभागाकडील जागेबाबत पुणे महानगरपालिकेने ३ तर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने ११ प्रस्ताव संबंधित स्थानिक कार्यालयास (प्रधान संचालक, डिफेन्स ईस्टेट, पुणे) सादर केलेले आहेत.

उपरोक्त बैठकीमध्ये दिलेल्या सुचनेनुसार, पुणे महानगरपालिकेने घोरपडी येथील पुणे-मिरज रेल्वे लाईन व पुणे-सोलापूर रेल्वे लाईन क्रॉसिंग येथील प्रस्तावित रेल्वे उड्डाणपुलासाठीच्या जागाबाबतचा आणि लुल्लानगर चौक-कोंढवा खुर्द येथील प्रस्तावित उड्डाणपुलासाठीच्या जागाबाबतचा प्रस्ताव दिनांक २०.१.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सादर केला आहे. सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांनी अनुक्रमे दिनांक २४.२.२०१५ व दिनांक ९.२.२०१५ च्या पत्रान्वये सचिव, संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

तसेच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने बोपखेल ता.हवेली येथील कॉलेज ऑफ मिल्ट्री इंजिनिअरिंग यांनी बंद केलेल्या बोपखेल-दापोडी रस्त्याबाबतचा प्रस्ताव दिनांक २८.१.२०१५ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे सादर केला असून, सदर प्रस्ताव जिल्हाधिकारी, पुणे यांनी दिनांक २३.२.२०१५ च्या पत्रान्वये सचिव, संरक्षण मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडे मान्यतेसाठी सादर केला आहे.

(४) वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

ठाणे येथील प्रशासकीय सेवा प्रशिक्षण देणाऱ्या संस्थेच्या इमारतीमध्ये होत असलेल्या पाण्याच्या गळतीबाबत

(३) * ३५४१ ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेमार्फत ठाणे येथे राज्यातील प्रशासकीय सेवेचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे म्हणून चिंतामणराव ऊर्फ सी.डी.देशमुख यांचे नावाने प्रशिक्षण संस्था चालविली जात असून सदर संस्थेस ठाण्यातील IAS फॅक्टरी म्हणून संबोधिले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीत प्रशासकीय सेवा प्रशिक्षणाचे वर्ग भरत असलेल्या कक्षात गेल्या वर्षापासून तेथील वरच्या मजल्यावरील प्रसाधनगृहातील पाण्याच्या गळतीमुळे वर्गामध्ये दुषित सांडपाणी साठून प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर परिणाम झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारतीची तातडीने दुरूस्ती व डागडुजी करावी म्हणून प्रशिक्षण संस्थेच्या प्रशासनाने ठाणे महानगरपालिका प्रशासनाकडे गेल्या वर्षभरापासून अनेकदा अर्ज-विनंत्या करूनही त्याप्रकरणी अद्याप कार्यवाही झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने याप्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) प्रशासकीय सेवेचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे याकरीता ठाणे महानगरपालिकेमार्फत संचलित संस्था चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण संस्था या नावाने ओळखली जाते.

(२) इमारतीच्या तळमजल्यावरील वर्ग खोली क्रमांक-१ मध्ये गळती होत असल्याचे जानेवारी २०१४ मध्ये निदर्शनास आले. मात्र त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर कोणताही परिणाम झाल्याची बाब आढळून आली नाही.

(३) होय.

इमारतीमधील १ ल्या मजल्यावरील स्वच्छता गृहाची दुरुस्ती करण्याबाबत महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार केल्यानंतर पहिल्या मजल्यावरील स्वच्छतागृहाचा वापर कायमस्वरुपी बंद केला असल्याने सांडपाणी / दुषित पाण्याबाबतची चिंतामणराव देशमुख प्रशासकीय प्रशिक्षण या संस्थेची समस्या दुर झालेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत एसआरए योजनेच्या पुनर्विकास प्रकल्पाचे काम नियमावली प्रमाणे करण्याबाबत

(४) * ३८२२ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग, ॲड.अनिल परब, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.राहुल नार्वेकर : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर आणि उपनगरात महानगरपालिकेच्या जमिनीवर वसलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे तसेच म्हाडाअंतर्गत योजनेचे अनेक प्रकल्प प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत एसआरए योजनेच्या पुनर्विकास प्रकल्पासाठी स्वतंत्रपणे विकास नियमावली असतांना अनेक विकासकांनी नियमावलीस बगल देवून इमारत बांधकामात अनियमितता केल्याबाबत एसआरए प्राधिकरणाने काही विकासकांना नोटीसा पाठविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विकासक कोणकोणते आहेत व त्यांचेवर कोणती कारवाई केली आहे,

(४) तसेच सदर एसआरए प्रकल्पाचे काम नियमावलीप्रमाणे करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तसेच म्हाडाच्या मालकीच्या जमिनीवरील अनुक्रमे ११७ व ९६ झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव परिशिष्ट-२ अनुक्रमे बृहन्मुंबई महानगरपालिका व म्हाडाकडील सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त न झाल्यामुळे प्रलंबित आहेत.

(२), (३) व (४) एस.आर.ए.ने विकासकांनी नियमालीस बगल देवून केलेल्या अनियमितते अनुषंगाने मागील एक वर्षाच्या कालावधीत १२ योजनांसंदर्भात खालील नमूद ११ विकासकांवर महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५३ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

१) श्री.एस.व्ही.जोशी,
२) मे.हरिओम कन्स्ट्रक्शन (श्री.जोसेफ)
३) मे.अरिहंत कन्स्ट्रक्शन कंपनी
४) इम्तियाज अहमद पार्टनर ऑफ ज्योती बिल्डर्स सी.ए.टू.विकास हाऊसिंग लि.
५) पवन सेठ ॲण्ड असोसीएट
६) मे.मिका इंजीनीअर्स
७) मे.फाईन डेव्हलपर्स,
८) मे.के.के.कन्स्ट्रक्शन
९) मे.जयेश बिल्डर्स
१०) मे.हरे कृष्णा बिल्डर्स
११) मे.धृवी कन्स्ट्रक्शन

त्यापैकी मे.के.के. कन्स्ट्रक्शन यांचेकडून रुपये २४,३९,१००/- इतका दंड वसूल करण्यात आला असून मे.अरिहंत कन्स्ट्रक्शन कंपनी यांचेविरुद्ध मुलुंड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

पुण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांची संख्या वाढविण्याबाबत

(५) * ३२०१ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानांची संख्या वाढविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी संबंधीतांकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्यापी निवासस्थांनामध्ये वाढ करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस कर्मचारी यांच्या निवासस्थानाची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळाकडून पुणे शहरातील पोलीस अधिकारी व कर्मचा-यांसाठी एकूण १०८५ निवासस्थाने बांधण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुण्यातील येरवडा तुरुंगातील कैद्यांकडे मोबाईल हॅन्डसेट व सिमकार्ड मिळाल्याबाबत

(६) * ३२९५ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील येरवडा तुरुंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांकडे मोबाईल हॅन्डसेट व सिमकार्ड मिळाली असून इतर कैदीही त्या मोबाईलचा वापर करत असल्याचे तपासाअंती निष्पन्न झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या संबंधीत विभागाने या प्रकरणास आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) माहे नोव्हेंबर, २०१४ च्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे नाही.

मात्र, न्यायाधीन बंदी मुन्ना दावल शेख याचे कोठडीमध्ये दिनांक ०६.०५.२०१४ रोजी कारागृहामधील अधिकाऱ्यांनी घेतलेल्या झडतीमध्ये मोबाईल जप्त करण्यात आलेला आहे.

(२) व (३) अशा प्रकरणास आळा घालण्यासाठी १ मोबाईल डीटेक्टर, २४ नग मोबाईल जामर, ३० नग वॉकी-टॉकी सेट, १३५ सी.सी.टीव्ही कॅमेरे, १२ नग हॅन्ड मेटल डीटेक्टर, १ नग डोअर फ्रेम मेटल डीटेक्टर, १ नग बॅगेज स्कॅनर यासारख्या प्रभावी उपाययोजना कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक शहरातील गुन्हेगारीवर आळा घालण्याबाबत

(७) * २८२० डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरात माहे नोव्हेंबर, २०१४ अखेरपर्यंत ११ महिन्याच्या कालावधीत ९७७ दुचाकी, चारचाकी वाहनांची चोरी झाल्याची बाब माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षात बॅग लिप्टींग, चेन स्नॅचिंग यासारख्या जबरी चोरीचे एकुण ११३ गुन्हे घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्नोक्त बाब १ व २ मधील गुन्हे घडून तसेच चोऱ्या घरफोड्या सारख्या घटना सातत्याने घडल्यानंतरही सदरहू गुन्ह्यांची चौकशी होण्यास विलंब होत आहे व सदरहू गुन्हे पोलीस कर्मयाऱ्यांची संख्या कमी असल्याने प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभुमीवर नाशिक शहरातील गुन्हेगारांवर आळा घालून गुन्हेगारी कमी करण्यासाठी व पोलीसांचे संख्याबळ वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पोलीस आयुक्त, नाशिक यांचे कार्यक्षेत्रात नमूद कालावधीत ६४६ दुचाकी व चारचाकी वाहन चोरीचे गुन्हे दाखल आहेत.
(२) होय, गतवर्षात पोलीस आयुक्त, नाशिक यांचे कार्यक्षेत्रात बॅग लिप्टींग, चैन स्नॅचिंगचे १२४ गुन्हे दाखल आहेत.
(३) हे खरे नाही.

गुन्ह्याबाबत माहिती मिळताच ताबडतोब पोलीस अंमलदार घटनास्थळी रवाना करुन तपास सुरु करण्यात येतो. पोलीस आयुक्त, नाशिक यांचे आस्थापनेवरील मंजूर पोलीस संख्याबळातून पोलीस कामकाजाचे नियोजन करुन त्यामधूनच गुन्ह्यांचा तपास पूर्ण करुन घेवून कायदेशीर कार्यवाही करण्यात येते.
(४) गृह विभागाच्या दि. ०४/०३/२०१४ च्या शासन निर्णयानुसार पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांचे आस्थापनेवर विविध संवर्गात ४४२ पदे निर्माण करण्यात आले आहेत.

सिंहस्थ कुंभमेळ्यादरम्यान कायदा व सुव्यवस्था राखणे करिता अन्यघटकाकडून जादा पोलीस मनुष्यबळ उपलब्ध करुन घेण्याचे प्रस्तावित आहे.

कायदा व सुव्यवस्था राखणेकरिता कर्मचारी अधिकारी यांना वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येते. तसेच कोंबींग ऑपरेशन, ऑलआऊट ऑपरेशन तसेच झोपडपट्टी चेकींग करुन सराईत व संशयीत गुन्हेगार यांचा शोध घेवून त्यांचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते.

सोसायटी मिटींग आयोजित करणे, नागरिकांनी सतर्क राहणेकरिता मार्गदर्शन करणे, सूचना फलक लावणे, तत्काळ संपर्काकरिता नियंत्रण कक्ष, पोलीस ठाणे यांचे फोन नंबर प्रसिध्द करणे इ. कार्यवाही करण्यात येते. तसेच स्थानिक संस्थांच्या मदतीने शहरात ठिकठिकाणी सी.सी.टी.व्ही. बसविण्याची कार्यवाही चालू आहे.
(५) विलंब झालेला नाही.

रत्नागिरी जिल्ह्यातील वशिष्टी-दाभोळ खाडीला पर्यटन स्थळ म्हणून घोषित करण्याबाबत

(८) * ३०९१ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील वशिष्टी-दाभोळ खाडीला पर्यटन स्थळ घोषित करून त्याचा केरळच्या धर्तीवर पर्यटनात्मक विकास व्हावा अशी तेथील समस्त गांवकऱ्यांची मागणी असल्याचे फेस्टिवलच्या माध्यमातून माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिपळूण नगर परिषदेच्या पर्यटन विकास निधीतून बोटिंगसाठी एक जेटीही तयार करण्यात आली असून ती जेटी पर्यटकांसाठी खुली होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील वशिष्टी-दाभोळ खाडीला पर्यटनचा दर्जा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे आला आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

(२) नाही.

(३) नाही. श्री राम रेडीज, रा. चिपळूण यांचेकडून दि. १६/५/२०१३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे विनंती प्राप्त झालेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

सातारा जिल्ह्यातील मांढरदेव येथे सन २००५ मध्ये झालेल्या दुर्घटनेवरुन करावयाच्या उपाययोजनांचा अहवाल शासनाने स्विकारला नसल्याबाबत

(९) * ४१०४ श्री.राहुल नार्वेकर, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्ह्यातील मांढरदेव येथील काळूबाई देवीच्या मंदिरात सन २००५ मध्ये झालेल्या दुर्घटनेवरुन करावयाच्या उपाययोजनांचा अहवाल माजी न्यायमूर्ती राजन कोचर यांनी शासनास सादर करुन दहा वर्ष होऊनही अद्याप शासनाने अहवाल स्विकारलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) मौजे मांढरदेव, ता.वाई, जि.सातारा येथील काळूबाई देवीची यात्रा सुरु असतांना दिनांक २५.१.२००५ रोजी झालेल्या चेंगराचेंगरीच्या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्यासाठी श्री.आर.जे. कोचर, निवृत्त न्यायाधीश, उच्च न्यायालय यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय चौकशी आयोगाची नियुक्ती दिनांक १६.३.२००५ च्या अधिसुचनेद्वारे करण्यात आली होती. या समितीने आपला अहवाल शासनास सादर केला होता व तो शासनाच्या विचाराधीन होता. परंतू, मंत्रालयात दि. २१.६.२०१२ रोजी लागलेल्या आगीमध्ये सदर अहवाल व त्याची मूळ नस्ती नष्ट झाली आहे. सदर अहवालाची प्रत चौकशी आयोगाकडून प्राप्त करुन घेण्यात आली असून चौकशी आयोगाने सादर केलेल्या अहवालावर शासनाने करावयाच्या कार्यवाही संबंधीचे ज्ञापन तयार करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

तथापि, सदर अहवाल सादर करण्यापुर्वी चौकशी आयोगाने अंतरिम अहवाल शासनास करुन उपाययोजना सुचविण्यात आलेल्या होत्या. सदर शिफारशींची प्रभावी अंमलबजावणी मांढरदेव, ता. वाई येथील यात्रेत शासनाच्या विविध विभागामार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर शहरातील रस्त्यांच्या दुरुस्ती बाबत

(१०) * ३८४७ श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकर, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील रस्त्यांच्या दुरुस्ती प्रस्तावाला मान्यता देण्याची कार्यवाही पूर्ण झाली असून अद्याप रस्ते दुरुस्तीच्या कामाला सुरवात झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांची कारणे काय आहेत,

(३) तसेच नागपूर शहरातील रस्ते दुरुस्तीची कामे पावसाळ्यापूर्वी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(५) ३०० कोटीचे सिंमेटचे रस्ते प्रस्तावित आहेत काय, झोपडपट्टीमधील रस्त्याचे डांबरीकरण केव्हा करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

नागपूर महानगरपालिकेतर्फे वर्षे २०१४-१५ या आर्थिक वर्षात नागपूर शहरातील रस्त्यांच्या दुरुस्तीकरीता रु. ८८.६० कोटी रकमेचे कार्यादेश निर्गमित करण्यात आले आहेत व जानेवारी २०१५ पर्यंत रु. ४५.७२ काटी रकमेचे कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) ज्या कामांचे कार्यादेश दिलेले आहेत ती कामे पावसाळयापूर्वी करण्याचे नियोजन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) होय. सुधारित डि.पी.आर. तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

आर्थिक वर्ष २०१४-१५ मध्ये शहरातील मागासवर्गीय वस्त्यामध्ये रस्ते तयार करण्याकरिता मागासवर्गीय कल्याण विशेष समिती अंतर्गत रु. ४.९० कोटी राशीचे कार्यादेश निर्गमित करण्यात आले. ज्या कामांचे कार्यादेश दिलेले आहेत ती कामे पावसाळयापूर्वी करण्याचे नियोजन महानगरपालिकेतर्फे करण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथील रस्त्यावर वाहतूक नियमनासाठी वाहतूक शाखेने बेकायदेशीरपणे वाहतूक पोलिसांची केलेली नियुक्ती

(११) * ३६४३ श्री.नरेंद्र पाटील, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथील रस्त्यावर वाहतूक नियमनासाठी वाहतूक शाखेने आपल्या मदतीसाठी बेकायदेशीरपणे १०० वाहतूक पोलिसांची नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर १०० वाहतूक पोलिसांना वाहतूक शाखेतर्फे महिन्याच्या पगारापोटी ७ लाख रूपये इतकी रक्कम दिली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व याबाबत शासानाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी येथे वाहतूक नियमनासाठी वाहतूक शाखेमार्फत ट्रॅफिक वॉर्डनची नियुक्ती करण्यात आलेली नाही.

भिवंडी परिसरातील गोदामांच्या भागामध्ये ग्रामपंचायती व गोडावून व्यावसायिक यांच्यामार्फत आणि उड्डाणपूलाच्या बांधकामाच्या ठिकाणी कंत्राटदारामार्फत वाहतूक सुरळीत ठेवण्याकरीता खाजगी व्यक्तींची नेमणूक केली जाते. गोदामाच्या भागातील नेमणूका व मानधन ग्रामपंचायत आणि गोडावून व्यावसायिक यांच्यामार्फत दिले जाते. उड्डाणपूलाच्या बांधकामाच्या ठिकाणी संबंधित बांधकाम कंत्राटदाराकडून नेमणूका व मानधन दिले जाते. उड्डाणपूलाच्या बांधकामास ठिकाणी पुरेसे खाजगी व्यक्ती रिफ्लेक्टर जॅकेटस सह नेमण्याच्या अटीच्या अधीन राहून वाहतूक विभागामार्फत उड्डाणपूलाच्या बांधकामास परवानगी दिली जाते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

रायगड जिल्ह्यातील नागोठणे येथे झालेल्या घरफोड्या

(१२) * ४२४० श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबइ-गोवा महामार्गालगतच्या रायगड जिल्ह्यातील नागोठणे येथे दिनांक १५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास एकाच रात्रीत १२ घरफोड्या करण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने किती आरोपींना अटक करण्यात आली वा येत आहे,

(४) अद्याप, अटक करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२), (३) व (४) प्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्याकडे कॉ.गु.र.नं. ०३/२०१५ भादंविसं कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यात एकूण १२ साक्षीदार यांचेकडे चौकशी करण्यात आली असुन श्वान पथक, अंगुलीमुद्रा तज्ञ यांना घटनास्थळी पाचारण करण्यात आले आहे. तसेच पोलीस ठाणे रेकॉर्डवरील गुन्हेगार, स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेकडील सजेशन मधील पुर्व गुन्हेगार यांना चेक करुन त्यांचेकडे तपास करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी आरोपीत यांना अटक करण्यात आली नसुन गुन्हा उघडकीस आणण्याचे दृष्टीने पोलीस विभागाकडील उपलब्ध यंत्रणेचा वापर करुन आरोपींचा कसुन तपास करण्यात येत आहे. गुप्त बातमीदार यांचे माध्यमातुन आरोपीत यांचा शोध चालु आहे.

विरार - बोळींज (ता.वसई) येथे कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने पाणीपुरवठा होत नसल्याचे कारण देत थांबविलेली भूखंड वितरण प्रक्रिया

(१३) * ४२९९ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे विरार - बोळींज (ता.वसई) येथे सुमारे १८०० सदनिका बांधण्याचे काम सद्या प्रगतीपथावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहर महानगरपालिकेने पाणी पुरवठा करण्यास असमर्थता दाखविल्यामुळे कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाने भूखंड वितरण प्रक्रिया थांबविली आहे, असे भूखंडाच्या सोडतीत यशस्वी झालेल्या अर्जदारांना जा.क्र. मि.व्य./को.मं./ ३६४३ /२०११ अन्वये मिळकत व्यवस्थापक, यांनी दिनांक १४ ऑक्टोबर, २०११ रोजी वा त्यासुमारास कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३)प्रश्न भाग (१) व (२) मधील वस्तुस्थिती खरी असल्यास, वसई - विरार शहर महानगरपालिकेने पाणीपुरवठा उपलब्ध केल्यामुळे १८०० सदनिका बांधण्याच्या कामाला २ वर्षांपूर्वी सुरुवात झालेली असूनही, १० वर्षापूर्वी भूखंडाच्या सोडतीत यशस्वी झालेल्या व भूखंडाच्या किंमतीचा भरणा केलेल्या अर्जदारांना मात्र पाणी पुरवठा उपलब्ध नसल्याची सबब पुढे करुन भूखंडाचा ताबा देण्यास हेतूपुरस्परपणे टाळाटाळ केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, १० वर्षापुर्वी भूखंडाच्या किंमतीचा भरणा करणा-या अर्जदारांना भूखंड वितरण करण्याचे काम किती मुदतीत पूर्ण केले जाईल, अशी अपेक्षा आहे?

श्री. प्रकाश मेहता : (१) या योजनेंतर्गत अल्प उत्पन्न गटांतर्गत ३५४८ व मध्यम उत्पन्न गटांतर्गत १८५१ अशा एकूण ५३९९ सदनिका बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) अशी वस्तुस्थिती नाही.

(३) व (४) ५३४ भूखंडाच्या सोडतीत यशस्वी झालेल्या १० वर्षापुर्वीच्या ५७७ अर्जदारांपैकी ४७९ पात्र अर्जदारांनी पैसे भरले असून, त्यापैकी ३५२ अर्जदारांना ताबा देण्यात आलेला आहे. उर्वरित लाभधारकांना भूखंडाचा ताबा देण्याची प्रक्रीया प्रगतीपथावर आहे.

याव्यतिरिक्त ९८ अर्जदारांची पात्रता तपासण्याची कार्यवाही करण्यात येत असून पैकी ४३ भूखंड उपलब्ध व्हावे यासाठी अभिन्यासामध्ये बदल करुन सुधारीत अभिन्यास वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे मंजूरीकरीता सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर अभिन्यासास सुधारीत मंजूरी प्राप्त झाल्यानंतर तसेच लाभार्थ्यांनी नियमानुसार आवश्यक अधिमुल्याचा भरणा मंडळाकडे केल्यानंतर भूखंड वितरण करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तारकर्ली, देवबाग, मालवण येथे बेकायदेशीर बोटींग व्यावसायिकांवर कारवाई करण्याबाबत

(१४) * ४३४० श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तारकर्ली, देवबाग, मालवण येथे अनधिकृत बेकायदा बोटींग करणाऱ्या व्यवसायिकांकडे स्थानिक बंदर विभाग व मेरीटाईम बोर्डाकडून दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील एकाही अनधिकृत बोटींग व्यावयायिकांवर कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, अनधिकृत बोटींग व्यवसाय करणाऱ्यास अभय देणाऱ्या अधिकारी व संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे नाही. माहे डिसेंबर, २०१४ मध्ये मालवण बंदरातील बेकायदेशीर बोटींग व्यावसासिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे, तसेच माहे जानेवारी, २०१५ मध्ये एकूण चार अनधिकृत बोटींग धारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील कंत्राटी सफाई कामगारांना ठेकेदारांकडून सफाईसाठी अत्यावश्यक असलेले सुरक्षिततेचे साहित्य न दिल्याबाबत

(१५) * ४५०० श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (जि.ठाणे) शहरातील स्वच्छता राखण्याचे काम कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत असून कंत्राटदारांनी सफाईसाठी अत्यावश्यक असलेले सुरक्षिततेचे साहित्य त्या कर्मचाऱ्यांना न दिल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील दैनंदिन साफसफाई व अनुषंगिक कामे महानगरपालिकेमार्फत कंत्राटी पध्दतीने करण्यात येत असून याकरीता मे.ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट सेल प्रा.लि. या संस्थेस मे, २०१२ पासून ५ वर्षांकरीता कंत्राट देण्यात आले आहे.

महानगरपालिकेने या संस्थेसोबत केलेल्या करारनाम्यानुसार कंत्राटी सफाई कामगारांना ठेकेदाराकडून दरवर्षी गणवेष जोडी, गमबूट व रेनकोट देण्यात येतात. तसेच या कामगारांच्या सुरक्षिततेकरीता उक्त संस्थेकडून मास्क, हॅन्डग्लोव्हज् इत्यादी सुरक्षा साहित्य पुरविले जाते. हे साहित्य मिळाल्याबाबत कंत्राटदाराकडुन संबधित कामगारांची वेळोवेळी स्वाक्षरी घेतली जाते व त्याबाबतची पोहोच महानगरपालिकेकडे उपलब्ध आहे. याशिवाय प्रत्येक कंत्राटी सफाई कामगाराची कर्मचारी राज्य विमा अंतर्गत नोंदणी करण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

तासवडे (ता.कराड जि.सातारा) येथील औद्योगिक वसाहतीमध्ये झालेला भीषण स्फोट

(१६) * ४५५८ श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कराड (जि.सातारा) तालुक्यातील तासवडे येथील औद्योगिक वसाहतीमधील (एमआयडीसी) दिनांक १८ जानेवारी, २०१५ रोजी सायंकाळी शॉर्ट सर्किटमुळे आग लागल्यानंतर भीषण स्फोट होवून या दुर्घटनेत २ कामगार जागीच ठार झाले असून अन्य पाचजण जखमी झाले असुन तीनजनांची प्रकृती गंभीर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुर्घटनेबाबत सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) तासवडे (ता.कराड, जि.सातारा) येथील औद्योगिक वसाहमध्ये दि. १८.१.२०१५ रोजी रासायनिक पदार्थांच्या कंपनीमध्ये आग लागून झालेल्या दुर्घटनेमध्ये ३ कामगार मयत झाले असून, एक जण जखमी झाला आहे.
(२) व (३) कारखाना निरीक्षक, यांच्या अभिप्रायानुसार मल्टिमील मशीनमध्ये दळण्याचे काम सुरु असताना ज्या प्लास्टिक बॅगमध्ये केमिकल पावडर साठविण्यात येत होती. त्या बॅगमध्ये स्टॅटीक चार्ज निर्माण होऊन, स्पार्क होऊन केमिकलला आग लागली आहे.

या घटनेमध्ये कारखाना मालकाविरुध्द महाराष्ट्र कारखाने अधिनियम, १९६३ च्या नियमांचा भंग केल्याबद्दल प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी, कराड येथे कारखाना निरीक्षक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य, पुणे यांनी खटले दाखल केले आहेत. कारखाना मालकाने मृतांच्या नातेवाईकांना कामगार न्यायालयाच्यामार्फतीने रु. १३ लाख देण्याचे मान्य केले असून, त्यापैकी प्रत्येकी रु. ३ लाख तात्काळ मदत केली आहे.

ठाणे शहरातील कोपरी येथील धोबीघाट झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतून बांधल्या जाणा-या गृहनिर्माण प्रकल्पामध्ये झालेला गैरव्यवहार

(१७) * ४६९७ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील कोपरी येथील धोबीघाट झोपडपट्टी पूनर्विकास योजनेतून बांधल्या जाणा-या गृहनिर्माण प्रकल्पामध्ये मोठा गैरव्यवहार झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एसआरएच्या नियमानुसार एका लाभार्थ्यांला एकच घर देण्याचा कायदा असतानाही कमिटी सदस्यांनी एकापेक्षा अधिक घरे घेतल्याची बाबही शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. प्रकाश मेहता : (१) ठाणे शहरातील कोपरी येथील धोबीघाट झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतून बांधल्या जाणा-या गृहनिर्माण प्रकल्पामध्ये गैरव्यवहार झाला असल्याची तक्रार दि. ०१.१२.२०१४, दि. १६.०१.२०१५ व दि. १८.३.२०१५ रोजीच्या पत्रान्वये तक्रारदाराने ठाणे महानगरपालिकेकडे केली होती. सदर तक्रार अर्जातील मुद्याची शहानिशा करुन संबंधित तक्रारदार यांना दि. २७/३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये त्यांच्या तक्रारीतील नमूद मुद्दयामध्ये तथ्य नसल्याचे ठाणे महानगरपालिकेमार्फत कळविण्यात आले आहे.

(२) सदर योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या स्लम इमारतीमधील स्लम क्षेत्रामधून झोपडीधारकांना व कमिटी सदस्यांना पात्रता यादी प्रमाणे प्रत्येकी एकच सदनिका देण्यात आली असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे कोरेगांव खुर्द (ता.खेड, जि.पुणे) येथील १३ वर्षीय मुलाच्या अंगावर रॉकेल ओतून जिवंत जाळल्याची घटना

(१८) * ४७३४ श्री.हेमंत टकले, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोरेगांव खुर्द (ता.खेड, जि.पुणे) येथील १३ वर्षीय मुलाच्या अंगावर रॉकेल ओतून जिवंत जाळल्याची घटना दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर मुलाला रॉकेल ओतून जिवंत जाळणा-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी चाकण पोलीस ठाणे येथे गुरक्र. ७/१५ भादंवि कलम ३०७, ३४ प्रमाणे दिनांक ०४.०१.२०१५ रोजी दोन अज्ञात इसमांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर मुलाचा उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याने सदर गुन्ह्यास भादंवि कलम ३०२ हे वाढवून लावण्यात आलेले आहे.

सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील एन.आर.सी.लि. कंपनीतील कामगारांची थकीत देणी अदा करण्याबाबत

(१९) * ४८२८ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोहने (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील एन.आर.सी.लि. या कंपनीमध्ये टाळेबंदी दाखवून येथील कामगारांची कोट्यवधीची देणी प्रलंबित असूनही कंपनीची शेकडो एकर जमीन विकासकाला विकून व्यावसायिक व निवासी सदनिकाचे टॉवर उभारण्याचे कंपनी व्यवस्थापनाने नियोजिले असल्याचे डिसेंबर २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय ,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) मे.एन.आर.सी.लि.मोहने च्या कंपनी व्यवस्थापनाने बिकट आर्थिक परिस्थितीमुळे कंपनीच्या ताब्यातील ३३९ एकर इतकी जमीन मे.रहेजा युनिव्हर्सल प्रा.लि.यांना विकण्याचा करार (MOU) दिनांक १.०३.२००७ रोजी केला आहे. तर दिनांक १५.११.२००९ पासून कारखान्यात टाळेबंदी लागू केली आहे व कामगारांची रु. ८०.०१ कोटी इतकी देणी प्रलंबित आहेत हे खरे आहे.

(२) व (३) होय,

दिनांक १६.०७.२००९ रोजी बी.आय.एफ आर. ने सदर उद्योग आजारी म्हणून घोषित केला आहे. विविध विषयांवर प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई तथा मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे प्रलंबित आहे. तसेच एन.आर.सी.मजदूर संघ या संघटनेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे सध्या बँकेत जमा असलेले रु. २४.५० कोटी कामगारांना वाटप करण्यासाठी याचिका दाखल केली असून सदर याचिका प्रलंबित आहे. कामगारांची थकित देणी अदा करण्याच्या दृष्टीने शासनाच्या विविध स्तरावर बैठका आयोजित करुन कामगारांच्या देय रकमा देण्याबाबत प्रयत्न केलेले आहेत. क्षेत्रिय कामगार कार्यालयाने व्यवस्थापनाविरुध्द किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत फौजदारी खटले दाखल केले होते. त्यामध्ये व्यवस्थापनास रु. ६००/- दंड झाला. ५२८ कामगारांचे अर्ज Early Retirement Scheme अंतर्गत व्यवस्थापनाकडून मंजुरीसाठी प्रलंबित आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मालवण तालुक्यातील तोंडवळी-वांयंगणी येथे सी वर्ल्ड प्रकल्प उभारण्याच्या निर्णयाबाबत

(२०) * ४९६१ श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण तालुक्यातील (जि.सिंधुदुर्ग) तोंडवळी-वायंगणी येथे सी वर्ल्ड प्रकल्प उभारण्याचा निर्णय मा.मुख्यमंत्री दिनांक २३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास सिंधू पर्यटन महोत्सवात जाहीर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणासाठी किती एकर जमीन संपादित करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, या प्रकल्पाला किती खर्च येणार असून हा प्रकल्प केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) सदर प्रकल्पासाठी सुमारे ३५० एकर जागा संपादित करण्याचे प्रस्तावित आहे.

(३) सदर प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी अंदाजे रु. १२० कोटी निधी आवश्यक आहे. प्रकल्पाचा सुसाध्यता अहवाल तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे.

ऑनलाईन सर्व्हेच्या नावाखाली स्पिक एशिया या सिंगापुरमधील कंपनीने लाखो गुंतवणूकदारांची केलेली फसवणूक

(२१) * ५२१४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ऑनलाईन सर्व्हेच्या नावाखाली स्पिक एशिया या सिंगापुरमधील कंपनीने लाखो गुंतवणूकदारांची फसवणूक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणात मुंबई आर्थिक गुन्हे शाखेने कंपनीच्या संजीव मेहतासह सहा जणांना दिनांक १ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणात मुंबई आर्थिक गुन्हे शाखेकडे फसवणूकीच्या अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तद्नुसार शासनाने चौकशी करुन दोषींविरोधात काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी निर्मलनगर पोलीस स्टेशन येथे गुरक्र. १५३/११, भादंवि कलम ४०६, ४२०, १२० (ब), सह प्राईज चीट अँड मनी सर्क्युलेशन स्कीम (बॅनिंग) ॲक्ट १९७८ चे कलम ३, ४, ५, ६ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदरचा गुन्हा तपासकामी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचे तपासामध्ये मुंबईसह इतर भागातील गुंतवणूकदारांनी अंदाजे रुपये २२७६ कोटींपेक्षा जास्त रक्कम आरोपित योजनेत गुंतवल्याचे आढळून आलेले असून प्रस्तुत गुन्ह्यात कलम ४६८, ४७१ भादंवि कलम ३, ४ एमपीआयडी ॲक्ट १९९९ तसेच कलम ६६ (अ) आयटी ॲक्ट यांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्यात दिनांक १६.१२.२०१३ रोजी आरोपित कंपन्यांसह २१ आरोपितांविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

सदर गुन्ह्यातील पाहिजे आरोपिंचे अटकेसाठी व अपहारित रकमांचे शोधकामी अधिक तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील गोरेगांव (पूर्व) येथील शहिद जनरल अरुण कुमार वैद्य मार्गावर दोन्ही बाजूने होत असलेली वाहतूक कोंडी

(२२) * ५३७३ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोरेगाव (पूर्व) रेल्वे स्थानक ते पश्चिम द्रुतगती मार्गावरुन दिंडोशी दिवाणी आणि सत्र न्यायालय इमारतीवरुन जाणा-या शहिद जनरल अरुण कुमार वैद्य मार्गावर दोन्ही बाजूने वाहतुकीची कायम कोंडी होत असल्यामुळे नागरीकांना नागरी निवारा वसाहत ते गोरेगाव रेल्वे स्थानकापर्यंत जाता येताना प्रवाशांना एक तासा पेक्षा जास्त वेळ लागतो असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोरेगाव पूर्व बेस्ट बस स्थानक आणि रेल्वे स्थानक येथे रिक्षा वाल्यांचे नियम बाह्य पार्किंग तेथील वाहतूक कोंडीला कारणीभूत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) उक्त प्रश्नात नमूद मार्गावर वाहतूक पोलीस आणि अधिका-यांची संख्या वाढविण्यात येणार आहे काय,

(४) गोरेगाव पूर्व बस स्थानक ते दिंडोशी कोर्ट आणि नागरी निवारा वसाहत पर्यंत मधील बस थांब्यावर न थांबणा-या जलदगती बस सेवा गर्दीच्या वेळी सुरू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) वाहतूकीच्या वर्दळीच्यावेळी, सुट्टीच्या दिवशी तसेच ओबेरॉय मॉलमध्ये सेल असल्यास त्यावेळी सदर मार्गावर वाहतूकीची कधी-कधी कोंडी होते.

(२) नियमबाह्य पार्किंगमुळे वाहतूक कोंडी होते. त्यावेळी रिक्षा चालकांवर कारवाई केली जाते. या ठिकाणी सहायक पोलीस उपनिरीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात आली असून १७९ रिक्षा चालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

(३) या मार्गावर एकूण १४ वाहतूक अंमलदार नेमलेले आहेत. सदर ठिकाणी वाहतूक अंमलदारांची मनुष्यबळाच्या उपलब्धतेनुसार नेमणूक करण्यात येते.

(४) गोरेगाव स्थानक पूर्व आणि नागरी निवारा वसाहती दरम्यानच्या दोन जंक्शनवरील वाहतूक सिग्नल व्यवस्थेमध्ये बदल करुन घेतलेला आहे. या बदलानंतर सदर जंक्शनवरील वाहतूक व्यवस्था सुरळीत झाली आहे. तसेच, गोरेगाव चेकनाका येथील सिग्नल व्यवस्थेमध्ये बदल करण्याबाबत बेस्ट प्रशासन प्रयत्नशील आहे. या मार्गावरील वाहतूक विचारात घेता, मधल्या बस थांब्यांवर न थांबणाऱ्या जलदगती बससेवा सुरु करुनही या मार्गावरील बस गाडया जलदगतीने प्रवास करु शकतील याची शक्यता अतिशय कमी असल्यामुळे सदर बससेवा सुरु करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

मुंबई - रेवस मार्गावर जलवाहतूक संस्थांना महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने भाडेवाढ करण्यास दिलेली परवानगी

(२३) * ५५५७ ॲड.अनिल परब : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-रेवस मार्गावर जलवाहतूक संस्थांना महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान भाडेवाढ करण्यास नुकतीच परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बोर्डाचे आदेश जलवाहतूक संस्था पाळत नसल्याने तीन दिवसात सेवा पूर्ववत सुरु न केल्यास परवाना रद्द करण्याची संस्थेला नोटीस दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, असे असले तरीही संस्थेला भाडेवाढ करण्यास मंजूरी देण्याची कारणे काय आहेत,

(४) या भाडेवाढीस जलवाहतूक प्रवासी संघटनेने तीव्र विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी पुढे कोणता निर्णय घेतला आहे व या प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) रेवस मार्गावरील प्रवासी संस्थेमध्ये झालेली घट तसेच इंधन, कर्मचा-यांच्या वेतन, बोटीची देखभाल व दुरुस्ती इ.मध्ये झालेल्या वाढीचा विचार करुन तात्पुरत्या स्वरुपात भाडेवाढ मंजुर करण्यात आली आहे.
(४) भाडेवाढीस जलवाहतूक प्रवासी संघटनेने विरोध केला आहे, हे खरे आहे.
(५) तिकीट दर वाढीसाठी कायमस्वरुपी सुत्र तयार करणेची कार्यवाही सुरु आहे.

औरंगाबाद शहरातील पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांचे दुभाजक व बेटांचे सुशोभिकरण करण्याबाबत

(२४) * ५६४५ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील पर्यटनस्थळांकडे जाणाऱ्या रस्त्यांचे दुभाजक व बेटांचे सुशोभिकरण या कामासाठी २ कोटी ६० लक्ष रुपयांच्या निविदांच्या प्रस्तावाबाबतचा तपशिल देण्यात आला नसल्याने सदर प्रस्तावाबाबत नागरीकांमध्ये विविध शंका निर्माण होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दुभाजक व सुशोभिकरणाच्या कामाबाबत सविस्तर तपशिल मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही. सदर कामाच्या निविदा दैनिक वर्तमान पत्रातून प्रसिध्द करुन ई-निविदा पध्दतीचा अवलंब करुन सक्षम प्राधिकरणाची अंतिम मान्यता घेऊन अंतिम करण्यात आलेल्या आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी मेट्रो फेज-२ व मेट्रो फेज-३ या प्रकल्पांची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत

(२५) * ५७७४ श्री.जर्नादन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जागोजागी होणारी वाहतुकीची कोंडी सोडविण्यासाठी एलिव्हेटेड लोकल ट्रेन, भुमिगत मेट्रो अशा महत्वाच्या पायाभूत सुविधांना शासनाने मंजूरी दिली असल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच, मेट्रो फेझ- २ व मेट्रो फेझ- ३ या प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्याकरिता एमएमआरडीए ने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मुंबईमधील वाहतुकीची कोंडी कमी करण्याच्या हेतूने मुंबई मेट्रो रेल, मोनोरेल, पूर्व मुक्त मार्ग, मुंबई ट्रान्स हार्बर लिंक इत्यादी सारखे प्रकल्प मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येत आहेत. मुंबई मेट्रो रेल्वे लाईन-३-कुलाबा-वांद्रे-सीप्झ या प्रकल्पाला राज्य शासनाने दि. ०३/०३/२०१४ रोजी मान्यता दिली आहे. सदर प्रकल्प संपुर्णत: भूयारी असून ३३.५ कि.मी. लांबीचा आहे. सदर मार्गावर एकूण २७ स्थानके प्रस्तावित आहे.

(२) व (३) यापूर्वी मंजूर केलेला मुंबई मेट्रो रेल्वे मार्ग-२ चारकोप-वांद्रे-मानखुर्द या उन्नत मार्गाऐवजी आता सदर मार्ग दहिसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द असा पूर्णत: भुयारी मेट्रो रेल्वे मार्गाचा प्रकल्प हाती घेण्याच्या अनुषंगाने प्रकल्प अहवाल तयार करुन घेण्यात आला आहे. सदर प्रकल्प अहवालास दिनांक २० नोव्हेंबर, २०१४ रोजी प्राधिकरणाने मान्यता दिली असून त्यास राज्य शासनाची मान्यता देण्याची बाब तपासण्यात येत आहे.

मुंबई मेट्रो मार्ग-३ कुलाबा-वांद्रे-सिप्झ या प्रकल्पाची अंमलबजावणी करिता मुंबई मेट्रो रेल महामंडळ मर्यादित (MMRCL) स्थापना करण्यात आली असून या प्रकल्पासाठी सर्वसाधारण सल्लागारांची नेमणूक प्रक्रिया सुरु आहे. तसेच पूर्व अर्हता प्रक्रिया पूर्ण करुन स्थानके आणि बोगदा यांची स्थापत्य कामे करण्यासाठी ९ निविदाकारांची निवडसूची तयार करण्यात आली आहे. प्रकल्पाची स्थापत्य बांधकाम निविदा प्रक्रिया सुरु करण्यात आली असून सन २०१५ अखेर निविदाप्रक्रिया पूर्ण होणे अपेक्षित आहे.

यवतमाळ शहरात राबविण्यात आलेल्या रस्ते अतिक्रमण हटाव मोहीमेतील विस्थापितांना पर्यायी जागा देणेबाबत

(२६) * ६३८३ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ शहरात रस्ते अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात येत असून सन २००० पर्यंत रहिवाशी पुरावे असलेल्या गोरगरीब कुटुंबाला पर्यायी जागा न देता त्यांची घरे निष्कासित करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्ते अतिक्रमण हटाव मोहिमेतील विस्थापितांना पर्यायी जागा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात वा येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) हे खरे नाही. कोणतीही निवासी अतिक्रमणे व कुटुंबे हटविण्यात आलेली नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

चेंबुर ते वडाळारोड या मोनो रेलच्या कामासाठी वडाळा रोड ते प्रतिक्षानगर बस डेपो पर्यंतचा रस्ता एका बाजुने बंद ठेवण्यात आल्याने नागरिकांची होत असलेली गैरसोय

(२७) * ६५९४ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबुर ते वडाळारोड या मोनो रेलच्या कामासाठी वडाळा रोड ते प्रतिक्षानगर बस डेपो पर्यंतचा सुमारे दिड कि.मी. चा रस्ता एका बाजुने बंद ठेवण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) चेंबुर ते वडाळा रोड या मोनो रेलच्या वडाळा रोड ते भक्ती पार्क या अंतरामधील मोनो रेलच्या पिलरच्या दोन्ही बाजुनी चार फूट रस्त्याची जागा बाजुच्या रस्त्यापेक्षा अर्धाफूटाने उंच असल्याने रस्ता वाहतुकीला अडथळा येत असुन, त्या ठिकाणी अपघात होतात, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा रस्ता बंद ठेवण्याची कारणे काय आहेत, तसेच प्रश्न भाग १ व २ प्रकरणी पिलरच्या बाजुच्या रस्त्याची लेवल एकसारखी करण्याबाबत आणि रस्त्याची दुहेरी वाहतूक चालु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

(२), (३) व (४) मोनोरेल खांबाच्या दोन्ही बाजूस रस्त्याच्या पातळीपेक्षा थोडीफार फरकाने उंच आहेत, हे खरे आहे. सदर अपघातसदृष्य जागेवर कॉक्रिटचे पॅनेल तोडून त्यावरती पेवर ब्लॉक लावून रस्त्याची पातळी समान ठेवण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच खांबालगत कॉक्रिटचे पॅनेल वर होणे याचे कारण शोधण्यासाठी व्ही.जे.टी.आय. या संस्थेची नियुक्ती केली होती. त्यांच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालावरती त्रयस्थ संस्थेतर्फे तपासणी करण्यासाठी केंद्रीय रस्ता व संशोधन संस्था (सी.आर.आर.आय.), दिल्ली, भारत सरकार या संस्थेची नियुक्ती केली असून सदर संस्थेने वेगवेगळ्या ठिकाणांचे नमुने गोळा करुन परिक्षण करण्यासाठी प्रयोग शाळेत पाठविले आहेत. सदर संस्थेचा अहवाल लवकरच अपेक्षित आहे.

पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या सदस्यांनी केलेला गैरव्यवहार

(२८) * ६५८५ श्रीमती स्मिता वाघ : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समितीच्या सदस्यांनी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला असून त्याची शासन स्तरावर तातडीने चौकशी व्हावी या मागणीसाठी दिनांक २ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास देवी भक्तांनी मोठ्या प्रमाणात मोर्चा काढून आंदोलन केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्या अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप या प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत व या बाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

(२) यासंदर्भात देवस्थान व्यवस्थापन समितीकडून अहवाल मागविण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई येथील नेपियन्सी रोडवरील ब्रीच कुटीर शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील दुकानदारांनी अनधिकृतपणे उभारलेले गाळे

(२९) * ६६०९ श्री.सतिश चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील नेपियन्सी रोडवरील ब्रीच कुटीर शॉपिंग कॉम्प्लेक्स मधील दुकानदारांनी अनधिकृतपणे गाळे उभारण्यात आल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, नेपियन्सी रोडवरील पदपथ महानगरपालिका, पोलीस अधिकारी व स्थानिक लोकप्रतिनिधींच्या आश्रयाने अनधिकृतरित्या फेरीवाल्यांनी अडविल्याने नागरिकांना पदपथावरून चालताना अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, सदरील रस्त्यावरील तसेच पदपथावरील अतिक्रमणे दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नेपियन्सी रोड ब्रीच कुटीर इमारतीमधील दुकानदारांनी केलेली वाढीव बांधकामे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक २१.०२.२०१३ रोजी महानगरपालिकेमार्फत कायदेशीर कारवाई पूर्ण करुन निष्कसित करण्यात आली आहेत. सदर निष्कासन कारवाईनंतर आजमितीपर्यंत सदर ठिकाणी वाढीव बांधकामे झाली नाहीत.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदरहू अनधिकृत फेरीवाल्यांविरुध्द महानगरपालिकेच्या अतिक्रमण निर्मुलन विभागामार्फत दिनांक ०२.०१.२०१५ पासून दिनांक १६.०३.२०१५ रोजी पर्यंत १४ वेळा निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात अठरा वर्षाच्या आतील मुला-मुलींचा लैंगिक छळ करणाऱ्या आरोपींवर बालकांचे लैगिंक शोषण प्रतिबंधक कायदयान्वये गुन्हा दाखल करण्याबाबत

(३०) * २८५७ डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अठरा वर्षाच्या आतील मुला-मुलींचा लैंगिक छळ झाल्यास त्यातील आरोपींवर बालकांचे लैगिंक शोषण प्रतिबंधक कायदा (पॉकसो) अन्वये गुन्हा दाखल करुन गुन्ह्यांतील आरोपींना अटक करण्याचे प्रावधान आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कायदयानुसार माहे जानेवारी, २०१४ ते ऑक्टोबर, २०१४ या कालावधीत पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन शहरात किती गुन्हे दाखल करण्यात आले आहे,

(३) असल्यास, या गुन्ह्यांतील किती जणांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) उर्वरित गुन्ह्यांमध्ये केव्हापर्यंत कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) (३) व (४) या कायद्यानुसार पुणे शहर आयुक्तालयातील पुणे शहर भागात १४४ गुन्ह्ये दाखल असून सदर गुन्ह्यांत १८२ आरोपींना अटक करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड भागात कायद्यानुसार ५० गुन्ह्ये दाखल असून त्यात ४९ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्यांबाबत पोलीस तपास सुरु आहे.

पुणे शहरातील पुणे महानगरपालिकेचे यांत्रिक वाहनतळ ठेकेदाराने खाजगी मोटार वितरकांच्या वाहनांसाठी राखून ठेवल्याबाबत

(३१) * ५०६८ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील पुणे महानगरपालिकेचे यांत्रिक वाहनतळ ठेकेदाराने नागरिकांच्या वाहनांसाठी देण्याऐवजी खाजगी मोटार वितरकांच्या मोटारीसाठी राखून ठेवले जात असून विशेष म्हणजे देखभालीसाठी दरवर्षी महापालिकेने ठेकेदारालाच किमान १२ लाख रुपये दिल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेकडून दरवर्षी देखभालीची रक्कम घेणे व दुसरीकडे वाहनतळ भाडे तत्वावर देण्याचा उद्योग करणा-या ठेकेदारावर व संबधित बेजबाबदार महापालिकेच्या अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) अदयाप कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे कोणती ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पुणे महानगरपालिकेने यांत्रिक वाहनतळ दिनांक ३.५.२०१३ च्या कार्यादेशानुसार देखभाल व दुरुस्ती व संचलनाकरिता ठेकेदार मे. रामरतन इन्फ्रास्ट्रक्चर यांना चालविणेस देण्यात आलेले आहे.

सदर वाहनतळ नागरिकांच्या वाहनांसाठी जागा उपलब्ध न होणे याबाबत कोणतीही तक्रार महानगरपालिकेकडे प्राप्त नाही. तसेच वाहनतळ खाजगी मोटार वितरकांच्या मोटारीसाठी राखून ठेवलेला नाही. मात्र, खाजगी मोटार वितरकाची वाहने ही ठेकेदाराने पार्किंग शुल्क आकारणी करुन पार्क केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये आढळून आले आहे.

महानगरपालिकेने केलेल्या करारानुसार पार्किंगमधून मिळणारे शुल्क आणि संचलन खर्च, लाईट बील, देखभाल दुरुस्ती खर्च इत्यादीमधील तफावत समायोजित करणेसाठी ठेकेदारास दिनांक ३.५.२०१३ ते दिनांक २.५.२०१४ या कालावधीच्या खर्चासाठी माहे सप्टेंबर, २०१४ मध्ये रुपये १२.१६ लक्ष अदा केले, अशी वस्तुस्थिती आहे.

(२) ठेकेदाराशी केलेल्या करारनाम्यानुसार यांत्रिक वाहनतळात पार्क होणाऱ्या वाहनांकरिता रक्कम रुपये ५/- प्रतितास पार्किंग शुल्क आकारणे अनुज्ञेय आहे.

करारनाम्यानुसार, खाजगी संस्थेची वाहने पार्किंग करणेबाबत कोणतेही निर्बंध नाहीत. तथापि, दिनांक ७ जानेवारी, २०१५ रोजी खाजगी मोटार वितरकाची वाहने यांत्रिक वाहनतळात पार्क होत असल्याच्या तक्रारीवरुन सदर वाहनतळ बंद करण्यात आला आहे. याशिवाय, करारनाम्यामध्ये दुरुस्ती करुन खाजगी संस्थेची अथवा खाजगी मोटार वितरकांची वाहने पार्क करु नये, या अटीच्या नव्याने समावेश करणेचा निर्णय घेण्यात आला आहे. या बाबींची पूर्तता होईपर्यंत वाहनतळ बंद ठेवण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे येथील श्रीरंग सोसायटी व राबोडी परिसरातील झोपडपट्टी पुनर्विकासाचे प्रलंबित असलेले प्रस्ताव

(३२) * ५५११ ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील श्रीरंग सोसायटी व राबोडी परिसरातील सुमारे ५०० पेक्षा अधिक झोपडपट्टी पुनर्विकासाचे प्रस्ताव ठाणे महानगरपालिकेकडे मंजुरीकरीता मागील अडीच वर्षापासून प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे कारागृहाच्या तटबंदीपासून ५०० मिटर अंतरावरील बांधकामांना परवानगी देण्यास ठाणे कारागृह प्रशासनाने नकार दिला असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासंदर्भात ठाणे मध्यवर्ती कारागृहाच्या सभोवती ५०० मीटर अंतरावरील बांधकामाबाबत निर्णय घेण्यासाठी गेल्या वर्षी राज्य शासनाने ठाणे महानगरपालिका आयुक्त, पोलीस आयुक्त आणि कारागृह उपनिरिक्षकांची सल्लागार समिती नेमलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी सदर समितीने निर्णय घेणे अपेक्षित असताना, ठाणे मध्यवर्ती कारागृह प्रशासनाच्या नकारात्मक भुमिकेमुळे कारागृह परिसरातील श्रीरंग सोसायटीमधील शंभरहून अधिक इमारती, राबोडी परिसर तसेच आसपासच्या पोलीस वसाहतीमधील धोकादायक इमारतींचा पुनर्विकास करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी कारागृह परिसरातील नागरिकांनी ठाणे महानगरपालिका आयुक्त तसेच प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग यांचेकडे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) राबोडी क्र. १ येथील झोपडपट्टी बी.एस.यु.पी. प्रकल्पांतर्गत महानगरपालिकेमार्फत विकसित करण्याचे नियोजित आहे.

(२) राबोडी येथील पुनर्विकास कामांना कारागृह सुरक्षिततेच्या कारणास्तव कारागृह प्रशासनाकडून हरकत घेण्यात आली आहे.

(३) होय.

(४) राबोडी येथील ठाणे महानगरपालिकेच्या नियोजित बी.एस.यु.पी. प्रकल्पाचा प्रस्ताव व प्रस्तावित इमारतीचे आराखडे सल्लागार समिती समोर ठेवण्यात आले असता, समिती मधील सदस्यांचे एकमत न झाल्याने याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागण्याचे ठरले आहे. तथापि असा प्रस्ताव अद्याप शासनास प्राप्त झालेला नाही.

(५) असे निदर्शनास आले नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत पार्किंगच्या दरात केलेली वाढ

(३३) * ३८२६ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत वाहनाच्या पार्किंगच्या दरवाढीस विविध राजकीय पक्षाचा विरोध असताना शासनाने पार्किंगचे दरात तिप्पट वाढ केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी करून पार्किंगचे दर कमी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) मुंबईत दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असून काही इमारती व चाळीत राहणा-यांना त्यांच्या आवारात वाहन उभे करण्यासाठी पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने व वाहतुकीत एकसुत्रता आणण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहे जानेवारी २०१५ चा ठराव क्रमांक १०८४ अन्वये निवासी वाहनतळ योजना अंमलात आणून वाहनाच्या पार्किंगच्या दरवाढीस मंजुरी दिली आहे.

त्यानुसार मुंबईतील इमारतीबाहेर रस्त्यांवर उभ्या करण्यात येणा-या वाहनांवर दिनांक ०१.०२.२०१५ पासून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ''ए'' वॉर्डमध्ये प्रायोगिक तत्वावर नवीन ''पे ॲण्ड पार्क पॉलिसी'' अंतर्गत वाहनतळ शुल्क आकारण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला होता. तथापि या निर्णयाला शासनाने दिनांक २९ जानेवारी, २०१५ रोजीच्या पत्रान्वये अंतरीम स्थगिती दिली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये वाढ करण्याबाबत

(३४) * ३२०२ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील वाढती लोकसंख्या व गुन्हेगारीचे वाढते प्रमाण लक्षात घेता पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची संख्या अत्यंत कमी असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) गृह विभागाच्या दि. ०४.०३.२०१४ शासन निर्णय अन्वये पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे अधिपत्याखाली

१) अलंकार पो.ठाणे (कोथरुड पोलीस ठाण्याचे विभाजन करुन)
२) चंदननगर पो.ठाणे (येरवडा पो.ठाण्याचे विभाजन करुन)
३) खडकवासला पो.ठाणे (वारजे माळवाडी पोलीस ठाण्याचे विभाजन करुन)
४) वाकड पो.ठाणे (हिंजवडी व सांगवी पोलीस ठाण्याचे विभाजन करुन)
५) सिंहगड रोड पोलीस ठाणे ६) दिघी पोलीस ठाणे, या ६ नविन पोलीस ठाण्यांना व त्यासाठी विविध संवर्गातील १५२३ पदांना मंजुरी देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील न्यायालयामधील प्रलंबित खटले निकाली काढण्याबाबत

(३५) * ३२९६ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उच्च न्यायालयाने सन २०१२ मध्ये वा त्यादरम्यान निर्गमित केलेल्या आदेशानुसार सन २००५ च्या आधीचे खटले त्वरीत निकाली काढावयाचे आहेत, तरी देखील या आदेशाच्या अंमलबजावणीत विलंब होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन या समस्येचे निराकरण करण्यासाठी काही उपाययोजना अंमलात आणणार आहे काय,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय,

(४) सदर तपशिल उपलब्ध नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही,

तथापि, राज्यातील न्यायालयांमधील जुनी व निरर्थक प्रकरणे निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) होय,

(३) मा.उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीकडून प्रलंबित न्यायिक प्रकरणांचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो आणि त्यांचा निपटारा करण्यासाठी योग्य ते निर्देश देण्यात येतात.

तसेच कच्चे कैदी (Under-trial prisoners) ज्यांचे न्यायालयीन खटले चालू आहेत व स्त्रीयांशी संबंधित गुन्ह्यांचे जुने खटले वेगाने निकाली काढण्यासाठी स्वतंत्र समिती देखरेख करत आहे.

त्याचप्रमाणे प्रलंबित खटले निकाली काढण्यासाठी विशेष मोहिम राबविणे, महालोक अदालत चालविणे, सकाळ व सायंकाळची विशेष न्यायालये चालविणे अशी उपाययोजना राबविण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक येथील के.बी.सी.ग्रुप ऑफ कंपनीने नागरिकांच्या केलेल्या फसवणूकी प्रकरणी तपासाची सद्यस्थितीबाबत

(३६) * ५२८५ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील के.बी.सी.ग्रुप ऑफ कंपनीने नागरिकांच्या केलेल्या फसवणूकीसंदर्भात कंपनी विरुध्द आडगाव पोलिस स्टेशन, नाशिक येथे दिनांक ८ मार्च, २०१४ रोजी वा त्यासुमारास गु.र.नं.३०१३/२०१४ अन्वये दाखल गुन्ह्याचा आर्थिक गुन्हे शाखेकडून सुरु असलेला तपास पुर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, तपासात काय निष्पन्न झाले व संबंधित प्रकरणातील परदेशात पळून गेलेल्या मुख्य आरोपीला अटक करण्याकरिता रेडकॉर्नर नोटीस बजावण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुख्य सुत्रधारास अटक करण्यात आली आहे काय, तसेच के.बी.सी.ग्रुप ऑफ कंपनीने एकुण किती रकमेस जनतेस फसविल्याचे स्पष्ट झाले आहे, तसेच मा. संचालक, न्याय वैज्ञानिक प्रयोगशाळा, पुणे येथे तपासासाठी पाठविण्यात आलेले संगणक व इतर साहित्याची तपासणी होवून त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे काय,

(४) अद्याप, तपास पुर्ण झाला नसल्यास व मुख्य आरोपीस अटक करण्यात आली नसल्यास, याबाबत होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नमूद गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(२) के.बी.सी.मल्टीस्टेट प्रा.लि.या कंपनीने ३० महिन्यामध्ये गुंतवणूकीच्या तिप्पट रक्कम देण्याचे प्रलोभन दाखवत अनेक गुंतवणूकदारांकडून कोट्यवधी रक्कमा जमा केल्या असून सदर कंपनीच्या बँक खात्यावर, संचालक/व्यवस्थापकांचे बँक खात्यावर मोठया प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याचे तसेच कंपनीच्या व संचालक/व्यवस्थापकांचे नावावर मोठया प्रमाणात स्थावर व जंगम मालमत्ता असल्याचे तपासात आढळून आले आहे. नवीन सभासदांना भविष्यात जास्त रक्कम देण्याचे आमिष दाखवून जमा झालेली काही रक्कम जुन्या सभासदांना देवून उर्वरित रक्कम स्वत:चे फायद्यासाठी वापर करीत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपीला अटक करण्यासाठी इंटरपोलद्वारे रेड कॉर्नर नोटीस बजावण्यात आली आहे हे खरे आहे.

(३) गुन्ह्यातील मुख्य आरोपी परदेशात पळून गेले असल्याने त्यांना अद्याप अटक करण्यात आलेली नाही.

सदर कंपनीने गुंतवणकदारांची सुमारे रु. २०८.८८ कोटी रकमेची फसवणूक केल्याचे आजपर्यंतच्या तपासात निष्पन्न झाले आहे.

कंपनीच्या कार्यालयातून ताब्यात घेतलेले ६ हार्डडिस्क, १ लॅपटॉप, १ एलसीडी तपासणीसाठी न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळा, सांताक्रुज, मुंबई येथे जमा केले असून त्यांचे कडून अद्याप तपासणी अहवाल प्राप्त झालेला नाही.

(४) या गुन्ह्याबाबत तपासणीची तसेच मुख्य आरोपीला अटक करण्याची कार्यवाही सुरु असून विलंब झालेला नाही.

खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शिवतर गावात चोरांनी केलेली घरफोडी

(३७) * ५९१९ श्रीमती हुस्नबानू खलिफे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खेड (जि.रत्नागिरी) तालुक्यातील शिवतर गावात दिनांक २५ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास गावातील बंदस्थितीत असलेली ८ घरे चोरटयांनी फोडली असून हजारो रुपयांची रोकड आणि काही वस्तू चोरीला गेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोपींना पकडण्यात पोलिसांना अपयश येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी खेड पोलीस स्टेशन येथे गुरक्र. १४/२१५ भादंवि कलम ४५४, ४५७ व ३८० दिनांक २९.०१.२०१५ रोजी दाखल आहे.

सदर गुन्हा दाखल होताच गुन्ह्याचा सविस्तर पंचनामा करण्यात आलेला आहे. तसेच गुन्ह्याचे साक्षीदारांच्या घटातील मिळालेल्या ठशांबाबत तपासणी करण्यात येत आहे. रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक आलेले असून गोपनीय बातमीदारांना गुन्हेगारांची माहिती घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. अद्याप गुन्ह्यातील आरोपी निष्पन्न झालेले नाहीत.

सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई महापालिकेच्या केईएम, सायन, नायर या प्रमुख रुग्णालयांसह अन्य उपनगरीय रुग्णालयांमध्ये औषधांचा होत असलेला तुटवडा

(३८) * ५५४० श्री.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महापालिकेच्या केईएम, सायन, नायर या प्रमुख रुग्णालयांसह अन्य उपनगरीय रुग्णालयांमध्ये औषधांचा तुटवडा होत असल्याची बाब दिनांक २२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) नुसार औषधे रुग्णालयात न मिळण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सर्वसामान्य रुग्णांना वेळीच औषधे मिळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के.ई.एम. सायन, नायर व इतर उपनगरीय रुग्णालयामध्ये रुग्णांवर उपचार करण्यासाठी आवश्यक असलेल्या अनुसूचीवरील औषधे पुरेशा प्रमाणात उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. तसेच अनुसूचीत औषधेही स्थानिक पातळीवर खरेदी करुन उपलब्ध करुन देण्यात येतात.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे अनुसूचित कंत्राटदारांकडून अनुसूचित औषधांचा पुरवठा होईपर्यंत रुग्णांना आवश्यक असणारी औषधांची खरेदी मागील अनुसूचीत कंत्राटदारांकडून मागील अनुसूचित दरानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येते. जी औषधे मागील अनुसूचीत कंत्राटदारांकडून प्राप्त झाली नाहीत अशी औषधे दरपत्रिका मागवून तसेच अत्यावश्यक व जीवनरक्षक औषधे स्थानिक पातळीवर खरेदी करुन रुग्णांना उपलब्ध करुन देण्यात येतात. अशाप्रकारे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून वेळीच रुग्णांकरिता औषधे उपलब्ध करण्यात येतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईत प्लास्टीक पिशव्यांचा वाढत्या वापरास आळा घालणेबाबत

(३९) * ५४१८ श्री.नरेंद्र पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) अधिनियम २००६ व महाराष्ट्र प्लास्टीक पिशव्या (उत्पादन व वापर) अधिनियम २००६ च्या नियम ८ नुसार किमान जाडी ५० मायक्रॉन पेक्षा कमी व आकार ८७१२ पेक्षा कमी असलेल्या प्लास्टीक पिशव्यांवर बंदी असताना मुंबईत अशा प्लास्टीक पिशव्यांचा सर्रासपणे वापर होत आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, मुंबई महानगरपालिकेकडे याबाबत कारवाई करण्याकरीता फक्त दोनच पथके असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईमध्ये पावसाळ्यात पूर परिस्थिती निर्माण होवू नये म्हणून शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मुंबईत ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांचा सर्रास वापर होतो हे खरे नाही.
(२) हे खरे नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये एकूण ६ पथकांचे प्लास्टिक प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरिता गठन करण्यात आले आहे.
(३) मुंबईमध्ये पावसाळ्यात पूर परिस्थिती निर्माण होऊ नये म्हणून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी निविदा मागवून ठेकेदारामार्फत सर्व छोट्या व मोठ्या नाल्यांची साफसफाई साधारणतः १ एप्रिल पासून सुरु करण्यात येते व ५ जून पर्यंत पावसाळ्यापूर्वी ठरविलेल्या उद्दिष्टानुसार पूर्ण करण्यात येते. पावसाळ्यादरम्यान नाल्यात तरंगणारा गाळ व प्लास्टिक पिशव्या इत्यादी काढण्यात येऊन पाण्याचा प्रवाह सुरळीत राहील याची खबरदारी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे घेण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) हे राष्ट्रमाता जिजाऊ यांचे जन्म ठिकाण पर्यटन स्थळ म्हणून विकसित करण्याबाबत

(४०) * ४३११ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेंद्र मुळक : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेड राजा (जि.बुलढाणा) हे राष्ट्रमाता जिजाऊ यांचे जन्म स्थळ असून हे ठिकाण पर्यटन स्थळ घोषीत करण्यात येऊन त्याचा विकास आराखडा तयार करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांनी सदरहू ठिकाणी विकास आराखडा तयार करण्याबाबत केलेल्या घोषणेनुसार राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या जन्म स्थळी पर्यटन विकास आराखडा तयार करण्यासाठी शासनाने किती निधीची तरतूद केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, सदरहू पर्यटन स्थळासाठी निधीची तरतूद केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) सदरचा आराखडा तयार करण्यासाठी कन्सल्टंट यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरु आहे. तथापि अद्यापी आराखडा शासनास प्राप्त झालेला नाही. त्यामुळे निधीची तरतूद करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

ठाणे महापालिकेच्या शिक्षण विभागातील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

(४१) * ४५०४ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका शिक्षण विभागात आरटीई नुसार महापालिकेच्या ८ गटांमधील शाळांत १०८६ शिक्षक, मुख्याध्यापक पदाची आवश्यक असताना सद्य:स्थितीत १०४५ शिक्षक, मुख्याध्यापक काम करीत आहेत याचा अर्थ ४१ शिक्षकांची कमतरता असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ४१ शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) ठाणे महानगरपालिकेतील शिक्षण विभागामध्ये ८ गटांमध्ये १२७ शाळा असून या सर्व शाळांमध्ये शिक्षण हक्क कायदा, २००९ नुसार ११०४ शिक्षकांची आवश्यकता आहे. तथापि, १०४५ शिक्षक कार्यरत असून गुजराथी माध्यमाची ५ पदे अतिरीक्त आहेत. सद्य:स्थितीत शिक्षकांची ७८ पदे रिक्त असल्याची वस्तुस्थिती आहे.

सदर रिक्त पदांमध्ये प्रत्यक्षात मराठी १५, हिंदी ०४, उर्दू ५९ अशी एकूण ७८ पदे रिक्त आहेत. यामध्ये उर्दु माध्यमाच्या शाळांमधील १४ मुख्याध्यापक व ४४ शिक्षकांच्या रिक्त पदाचा समावेश आहे.

(२) मराठी, हिंदी माध्यमाच्या शाळांची पट संख्या दरवर्षी कमी होत असल्याने रिक्त असलेल्या मराठी व हिंदी शिक्षकांच्या रिक्त पदांची मागणी शासनाकडे नोंदविलेली नाही.

तथापि, उर्दु माध्यमाच्या ४६ पदांची मागणी शिक्षण परिषद, पुणे यांचेकडे दिनांक ०१.०२.२०१४ रोजी करण्यात आली होती. त्यापैकी ४४ पदांची यादी दिनांक २९.५.२०१४ रोजी प्राप्त झाली होती. त्यापैकी या यादीतील २३ शिक्षक हजर झाले व उर्वरित २१ शिक्षकांकरीता पुन्हा दिनांक २०.०८.२०१४ व दिनांक २४.०९.२०१४ रोजी पुनश्चः मागणी करण्यात आली आहे.

दिनांक ३०.०९.२०१४ ची माध्यम निहाय पटसंख्या विचारात घेवून मुख्याध्यापक व शिक्षक यांचे समायोजन आणि नियुक्तीची कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

राज्य पोलीस दलास आधुनिक शस्त्रास्त्रे व इतर साधन सामग्री उपलब्ध करून देणेबाबत

(४२) * ४५६३ श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहशतवादी हल्ल्यांबाबतची माहिती गुप्तचर विभागाकडून वारंवार मिळाल्यानंतरही राज्य पोलीस दलात गेल्या दीड वर्षात नवी शस्त्रास्त्रे, दारुगोळा, किंवा बुलेटप्रूफ जॅकेट्स अशी कोणतीही सामग्री उपलब्ध झालेली नाही यामुळे पोलीस दलाचे आधुनिकीकरण मागे पडले आहे, हे खरे आहे काय,

(२) राज्य दहशतवादविरोधी दलाने (एटीएस) राज्य शासनाला सुचविलेल्या यादीतील एकही वस्तु त्यांना आजमितीस मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू सामग्री खरेदी करुन पोलीस दलाला उपलब्ध करून देण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) पोलीस दलाच्या आधुनिकरणासाठी आवश्यक असलेली साधनसामुग्री उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

शस्त्रास्त्रे व दारुगोळा खरेदी करण्याची कार्यवाही वेळोवेळी करण्यात येते.

बुलेटप्रुफ जॅकेटची खरेदी करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) व (३) दहशतवाद विरोधी पथकास बुलेट प्रुफ जॅकेट व्यतिरिक्त आवश्यक वस्तु पुरविण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे त्यांना एकही वस्तु आजमितीस मिळालेली नाही, हे खरे नाही.

तसेच ए.टी.एस.साठी काही वस्तूंची खरेदी करण्यासाठी मंजूरी देण्यात आली आहे.

(४) पोलीस दल आधुनिकीकरण योजना सन २०१४-१५ च्या रु. १९,२२७.८० लाख रकमेच्या वार्षिक कृती आराखडयास प्रशासकीय मान्यतेबाबतचा शासन निर्णय दि. १३.११.२०१४ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. तसेच पोलीस दल आधुनिकीकरण कार्यक्रमाचा सन २००३-०४ आणि सन २००५-०६ ते सन २०१३-१४ या कालावधीमधील अखर्चित रकमेचा कार्यक्रम सन २०१४-१५ मध्ये राबविण्यासाठी दि. ०३.०२.१०१५ च्या शासन निर्णयान्वये रु. १०८२६.४४ लाख इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने साधनसामुग्री खरेदी करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

मुंबईतील ऑर्थर रोड कारागृहाच्या परिसरातील जीर्ण व मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पुनर्विकासबाबत

(४३) * ४६९९ श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कारागृहाच्या १५० मीटर परिघात नवीन बांधकाम करता येणार नाही, असा निर्णय २ वर्षापूर्वी शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये बदल करून ५०० मीटर परिसरात बांधकामाला बंदी आणली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबईच्या मध्यभागी असलेल्या ऑर्थर रोड कारागृहाच्या ५०० मीटर परिघात ५५२ इमारती या मोडकळीस आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या नवीन नियमानुसार या इमारतीचा पुनर्विकास होणार नाही, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, जीर्ण झालेल्या या इमारतीत रहिवाशी जीव मुठीत धरुन राहात आहेत, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) शासन गृह विभागाकडून दिनांक १३.८.२००९ च्या पत्रान्वये मुंबई मध्यवर्ती (आर्थर रोड) कारागृहाच्या मुख्य तटभिंतीपासून १५० मी. परिघात इमारतीचे बांधकाम करण्यास मंजूरी देवू नये असे बृहन्मुंबई महानगरपालिकेस निर्देश दिलेले होते. तद्नंतर दिनांक १८.१.२०१२ रोजीच्या पत्रान्वये कारागृह विभागाची ना हरकत असल्याशिवाय बांधकाम करण्यास मंजूरी देऊ नये असे निर्देश दिलेले आहेत.
(२) ते (६) मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये कारागृहानजीकच्या उंच इमारतीमुळे कारागृहातील कैदी यांच्या जीवाला धोका असल्याच्या मुद्दयावरुन कारागृहाच्या सुरक्षिततेच्या बाबींच्या अुनषंगाने फौजदारी याचिका क्र. २७६१/२०११ सह ३५२८/२०११ दाखल झालेल्या आहेत. सदर याचिकेमधील मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या २४.१०.२०१३ रोजीच्या आदेशास अनुसरुन शासनाने दिनांक ४.१२.२०१३ रोजी राज्यातील नियोजन प्राधिकरणांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४(१) अन्वये निदेश दिलेले आहेत. सदर निदेशानुसार नियोजन प्राधिकरणांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील कारागृहाच्या सभोवताली ५०० मीटरच्या अंतरामध्ये कोणतीही विकास परवानगी देण्यापूर्वी सदर निदेशानुसार गठीत करण्यात आलेल्या स्थायी सल्लागार समितीची पूर्व संमत्ती घेणेची अट घातलेली आहे. ५०० मीटर अंतरामध्ये बांधकामाना बंदी घातलेली नाही.

आर्थर रोड परिसराच्या ५०० मीटर परिसरात बहुतांशी उपकरप्राप्त इमारती आहेत. ५०० मीटर अंतरामध्ये निश्चित किती इमारती येतात याबाबत सर्वेक्षण केलेनंतर इमारतीची संख्या निश्चित होईल. तथापि सदर इमारतीचा पुनर्विकास होणारच नाही अशी बाब नाही. यासंदर्भात कारागृहाच्या सुरक्षिततेचा मुद्दा तसेच विकासाचा मुद्दा विचारात घेवून विकास परवानगीसंदर्भात स्थायी सल्लागार समितीने अुनसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत शासनाकडून लवरकच मार्गदर्शक तत्वे निर्गमित करणेत येणार आहेत.

ठाणे महापालिकेने नागरीकांना मीटरप्रमाणे पाणी बील व टीएमटी तिकिट दर वाढविण्याचा घेतलेला निर्णय

(४४) * ४७३८ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेने नागरीकांना मीटरप्रमाणे पाणी बील व टीएमटी तिकिट दर वाढविण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान तिस-या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्वसामान्य नागरीकांना सदर कराचा भुर्दंड पडू नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

ठाणे महानगरपालिकेने घरगुती वापराच्या पाण्याकरीता क्षेत्रफळाच्या प्रमाणात दर आकारणी करणे व पहिवहन सेवेच्या भाडेदरात वाढ करण्याचा प्रस्ताव अनुक्रमे फेब्रुवारी, २०१५ व मार्च, २०१५ च्या महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे. सदर दोन्ही प्रस्तावास ठाणे महानगरपालिकेच्या महासभेची मंजुरी मिळालेली नाही.

(२) व (३) सदर प्रस्तावास ठाणे महानगरपालिकेची मंजुरी मिळाली नसल्यामुळे पुढील कार्यवाहीचा प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील माझगांव येथील भु.क्र.६/१२४ व क्र.३१२ येथील भुखंडावर विकासकाने विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लघंन करुन पुनर्विकासामध्ये गैरव्यवहार व अनियमितता केल्याबाबत

(४५) * ४८३० श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील माझगांव येथील दि धनजीभाई चाळ सेवा संघाचा भु.क्र.६/१२४ व क्र.३१२ येथील भुखंडावर विकासकाने विकास नियंत्रण नियमावलीचे उल्लघंन करुन पुनर्विकासामध्ये गैरव्यवहार व अनियमितता केल्याबाबत तसेच शासनाचा महसूल बुडवून शासनाची फसवणूक केल्याबाबत सदर संस्थेने माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) मुंबईतील माझगांव येथील दि धनजीबाई चाळ सेवा संघाचा भु.क्र.६/१२४ व क्र. ३१२ येथील भुखंडावर विकासकाने विकास नियंत्रण नियमारवलीचे उल्लंघन करुन पुनर्विकासामध्ये गैरव्यवहार व अनियमितता केल्याबाबत तसेच शासनाचा महसूल बुडवून शासनाची फसवणूक केल्याबाबत सदर संस्थेने माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये शासनाकडे तक्रार केलेली नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी मेडीकल प्रवेशासाठी विद्यार्थ्यांकडून लाच घेतल्याबाबत

(४६) * ५२२१ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयाच्या मुख्य वैद्यकिय अधिकारी यांनी मेडीकल प्रवेशासाठी २३ लाख रुपयांची लाच घेताना दिनांक ३ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास रंगेहाथ पकडण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मुख्य वैद्यकीय अधिकाऱ्यांनी यापूर्वीही मेडीकल प्रवेशासाठी अनेक विद्यार्थ्यांकडून लाखो रुपयांची लाच घेतली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) नाही.

(२) अद्यापपर्यंतच्या तपासामध्ये तसे निष्पन्न झालेले नाही.

(३) व (४) सदरबाबत तपास सुरु असून अद्यापपर्यंत अशा प्रकारचे तक्रार देण्यासाठी इतर कोणतेही साक्षीदार समोर आलेले नाहीत. तथापि, चौकशीमध्ये कस्तुरबा रुग्णालयाच्या महिला वैद्यकीय अधिकारी यांनी विद्यार्थ्यांना मेडीकल कॉलेजला प्रवेश मिळवून देण्यासाठी २३.१३ लाख रुपये घेवून प्रवेश मिळवून न देता फसवणूक केलेबाबत आग्रीपाडा पोलीस ठाणे येथे गुरक्र. १४/१५ भादंवि कलम ४२०, ४०६,३४ अन्वये गुन्हा दाखल असून, या प्रकरणी त्यांना दिनांक ०३.०२.२०१५ रोजी अटक करण्यात आलेली आहे. सदर अटक महिला आरोपीकडून पोलीस कोठडी दरम्यान फसवणूक झालेली काही एक रक्कम हस्तगत करण्यात आलेली नसून, अटक महिला आरोपीस सत्र न्यायालयाने दिनांक २५.०२.२०१५ रोजी लायक जामीनावर मुक्त केलेले आहे. सदर प्रकरणी एका पाहिजे आरोपीताचा शोध घेणे चालू आहे.

सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्याकरिता तयार करण्यात येत असलेल्या सर्वसमावेशक चलन शिलता आराखडया बाबत

(४७) * ६५५६ प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.संजय दत्त : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील वाहतूक व्यवस्था सुधारण्याकरिता सर्वसमावेशक चलन शिलता आराखडा (Comprehensive Mobility Plan) तयार करण्यात येत असून यात मुलूंड विभागाचा समावेश करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आराखड्यानुसार मुलूंड मधील म्हाडा कॉलनी व इतर परिसरातील अर्धवट राहिलेल्या मार्गिकांचा (Missing Link) अभ्यास करुन उपाययोजना करण्यासाठी सल्लागार नेमण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या सल्लागाराचे नाव काय व या सल्लागाराला आपला अहवाल सादर करण्यास किती कालमर्यादा देण्यात आली आहे,

(४) नसल्यास, सल्लागारांकडून अहवाल लवकरात लवकर प्राप्त होण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे वा करीत आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

(२) संपूर्ण मुंबई शहरातील अर्धवट राहिलेल्या मार्गीकांचा अभ्यास करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत सल्लागाराची नेमणूक केलेली असून सदर अभ्यासात मुलुंडमधील म्हाडा कॉलनीचा समावेश करण्यात येईल.

(३) सल्लागाराचे नांव मे.लि असोशिएटस् साऊथ एशिया प्रा.लि.आहे. सदर सल्लागारास अहवाल सादर करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत कार्यादेश देण्यात आला असून मार्च २०१४ पासून एकूण १६ महिने एवढी कालमर्यादा देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील लालबाग परिसरात दिनांक, ४ जानेवारी २०१५ रोजी दंगलसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याबाबत

(४८) * २८४८ डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.हेमंत टकले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, श्री.ख्वाजा बेग, ॲड.निरंजन डावखरे, श्री.धनंजय मुंडे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ४ जानेवारी, २०१५ रोजी मुस्लिम समाजाच्या ईद-ए-मिलाद सणानिमित्त सायंकाळपासून काढण्यात आलेल्या जुलूसामधील काही तरुण रात्री साडे आठच्या सुमारास मुंबई शहरातील लालबाग परिसरातील रस्त्यावरुन मोटारसायकलवरुन ट्रिपलसीट उलटया दिशेने येत असलेल्या तरुणांना पोलिसांनी अडविल्यामुळे पोलिसांशी वाद घालत असतांनाच या तरुणांच्या मदतीला आणखी दहा ते पंधरा तरुण गोळा होऊन बंदोबस्तावरील पोलिसांना दमदाटी करण्याची घटना घडली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी आतापर्यंत किती जणांना ताब्यात घेतले आहे व त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) मुंबई शहरात रात्रीच्या वेळी अशा प्रकारे तरुण मुले-मुली मोटारसायकल ट्रिपलसिट तसेच बेधुंदपणे वाहने चालवित असतात, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, अशा वाहनचालकांवर कारवाई करण्याकरिता कोणत्या उपाययोजना पोलिस प्रशासनाकडून करण्यात येत आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) फिर्यादीस मारहाण करुन मोटारसायकलींचे नुकसान केल्याबाबत भोईवाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.०१/१५ कलम ३२६, ३२४, ४२७, १४१, १४३, १४४, १४७, १४८, १४९ भा.दं.वि. अन्वये दिनांक ०५.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच कर्तव्यावर असलेल्या वाहतूक पोलीसांशी हुज्जत घालून शासकीय कामकाजात अडथळा आणल्याबाबत भोईवाडा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०२/१५ कलम ३५३, ३२३, ५०४, १४१, १४३, १४४, १४७, १४८, १४९ भा.दं.वि. अन्वये दिनांक ०५.०१.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोन्ही गुन्ह्यांचा पुढील तपास सुरु आहे.

(३) व (४) अशा प्रकारे तरुण मुले-मुली मोटारसायकल ट्रिपलसिट तसेच बेधुंदपणे वाहन चालवताना आढळून आल्यास मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करण्यात येत आहे.

पुणे शहरातील घोरपडी येथील महापालिकेचा जलतरण तलाव व जिम्नॅशियम हॉल गेल्या तीन वर्षापासून बंद असल्याबाबत

(४९) * ५०६९ श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात कोट्यवधी रुपये खर्च करुन घोरपडी येथे महानगरपालिकेच्या जलतरण तलाव व जिम्नॅशियम हॉल गेल्या तीन वर्षापासून बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेने बंद ठेवलेल्या जलतरण तलाव व जिम्नॅशियम हॉलबाबत बेजबाबदार असणा-या अधिका-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) जलतरण तलाव व जिम्नॅशियम हॉल सुरु करण्याकरिता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कारवाई व उपाययोजना केली नसल्यास विलंबास कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पुणे पेठ घोरपडी येथील पुणे महानगरपालिकेचा जलतरण तलाव व जिम्नॅशियम हॉल मार्च, २०१२ मध्ये बांधून पूर्ण झाला असून, मागील तीन वर्षापासून सदर जलतरण तलाव व जिम्नॅशियम हॉल बंद अवस्थेत आहे.

(२) पुणे शहरातील घोरपडी येथील जलतरण तलाव चालविण्यास देण्यासाठी ऑगस्ट, २०११ मधील निविदा प्रक्रियेनुसार महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्र. ३८, दिनांक १७.५.२०१२ अन्वये चॅम्पियन ॲक्वेटींक क्लब यांची निविदा मंजूर केली. त्यानुसार सुरक्षा अनामत रक्कम भरण्याबाबत सदर निविदाकारास कळविले असता त्यांनी सदर ठेका घेण्यास नकार दिल्यामुळे त्यांची निविदा अनामत रक्कम जप्त करण्यात आली असून, सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आली.

सप्टेंबर, २०१३ मध्ये हा जलतरण तलाव चालविण्यास देण्यासाठी फेर निविदा प्रक्रिया राबविण्यात येवून, महापालिका मुख्य सभा ठराव क्र. ७६, दिनांक २३.६.२०१४ अन्वये भगत स्विमिंग पूल्स यांची निविदा मंजूर करण्यात आली. त्यानुसार अनामत रक्कम भरण्याबाबत कळविण्यात आले असता, या निविदाकाराने ऑगस्ट, २०१४ मध्ये जलतरण तलावाच्या दुरुस्तीची कामे प्रलंबित असल्याने अशी कामे पूर्ण झाल्यावर तलाव चालविण्यासाठी ताब्यात घेऊ, असे कळविले.

तद्नंतर महानगरपालिकेमार्फत टाईल्स, खिडक्या, फिल्टरेशन यंत्रणेमधील पंप दुरुस्ती इ. दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात येत आहेत. सदर कामे पूर्ण होताच निविदाकाराकडून अनामत रक्कम भरुन घेवून करार करुन कामाचे आदेश देण्यात येतील व सदर जलतरण तलावाचा वापर मे, २०१५ अखेर सुरु होईल.

तसेच जिम्नॅशियम हॉलचे बांधकाम पूर्ण झाले असले तरी अद्याप तेथे आवश्यक व्यायामाचे साहित्य पुरविण्यात आलेले नसल्यामुळे या हॉलचा वापर सुरु करण्यात आलेला नाही.

सारांशत: पहिल्या निविदाकाराने काम करण्यास नकार देणे, जलतरण तलावाची दुरुस्तीची कामे करावी लागणे, या कारणांमुळे जलतरण तलाव सुरु होण्यास विलंब झालेला आहे.

(३) जलतरण तलावाच्या दुरुस्तीचे काम करण्यात येवून, संबंधित ठेकेदाराकडून अनामत रक्कम भरुन घेऊन, करार करुन कामाचे आदेश देण्यात येतील व जलतरण तलावाचा प्रत्यक्ष वापर सुरु करण्यात येईल.

तसेच जिम्नॅशियम हॉलमध्ये व्यायाम साहित्याचा पुरवठा झाल्यानंतर हा हॉल चालविण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवून ठेकेदार निश्चित करुन हॉलचा वापर सुरु करण्यात येत आहे.

(४) वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

ठाणे खाडीचे सुशोभिकरण करून जलवाहतूक सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत

(५०) * ५५१६ ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे खाडीचे सुशोभिकरण करुन त्यात जलवाहतूक सुरु करण्याच्या मागील अडीच वर्षापासून प्रलंबित असलेल्या ठाणे महापालिकेच्या प्रस्तावास केंद्र शासनाची मान्यता मिळाली असल्याचे दिनांक २० डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार ठाणे महानगरपालिकेचे तत्कालिन आयुक्त यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास मा.केंद्रीय रस्ते व जलवाहतूक मंत्री तसेच मा.केंद्रीय वन व पर्यावरण मंत्री यांचे सोबत झालेल्या बैठकीत सदर प्रकल्पाचे सादरीकरण केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तद्नुसार याप्रकरणी पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, तसेच याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे नाही.

(२) होय हे खरे आहे.

(३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ३२ कि.मी. लांबीच्या खाडी किनाऱ्याचे सुशोभिकरण व संवर्धन- वॉटर फ्रंट डेव्हलपमेंट मास्टर प्लॅन पैकी सिडको बस स्टॉप ते साकेत पर्यंतच्या ३.४ कि.मी. लांबीच्या या एका भागाच्या प्रकल्पास राज्य शासनाच्या महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरीटीने दिनांक २९.०५.२०१४ ते दिनांक ३१.०५.२०१४ या कालावधीत झालेल्या बैठकीत अटी व शर्तीस अधीन राहून पर्यावरण परवानगी दिली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

मुंबईत म्हाडाच्या संक्रमण शिबिरात घुसखोरी करून राहणाऱ्या व म्हाडाच्या नियमानुसार भाडे न भरणाऱ्या घुसखोरांवर कारवाई करण्याबाबत

(५१) * ३८२७ श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.धनंजय मुंडे, श्री.रामराव वडकुते, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.सतिश चव्हाण, श्री.किरण पावसकर, श्री.सुनिल तटकरे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ख्वाजा बेग : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत म्हाडाच्या संक्रमण शिबिरात घुसखोरी करून राहणाऱ्या घुसखोरांवर म्हाडाच्या नियमानुसार भाडे न भरणाऱ्यांवर म्हाडाच्या आर.आर.बोर्डाने माहे जानेवारी, २०१५ च्या पहिल्या सप्ताहात कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१), (२) व (३) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिरामध्ये घुसखोरी / अनधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या रहिवाश्यांकडून दिनांक १/०४/२०१० पासुन रुपये ३०००/- प्रति माह सेवा आकार वसूल करण्यासंबंधी मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने दिनांक ०४/०२/२०१० रोजी ठराव क्रमांक ६४६२ नुसार धोरणात्मक निर्णय घेतला आहे . असे असले तरी संक्रमण शिबिरामध्ये वास्तव्य करीत आलेले घुसखोर/अनधिकृत रहिवाशी सेवा आकारपोटी रुपये ३०००/- अदा करीत नाहीत. सेवा आकाराची थकबाकी अदा करण्याबाबत संबंधित घुसखोर/ अनधिकृत रहिवाश्यांना वैयक्तिकरित्या कळविण्यात येत आहे. तसेच संक्रमण शिबिरामध्ये फलक लावणे, मंडळाच्या कर्मचा-यांचे पथक निर्माण करुन त्या पथकामार्फत सेवा आकार वसूल करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणे अशी कारवाई मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे करण्यात येत आहे. मंडळाने पाठपुरवठा करुनही जे रहिवाशी रुपये ३०००/- प्रमाणे मागील सेवा आकार थकबाकीसह अदा करणार नाहीत त्यांच्या संक्रमण गाळयांचे विद्युत जोडणी खंडीत करण्यात येईल, तसेच त्यांच्याविरुध्द निष्कासनाची कारवाई करण्यात येईल.

पुणे महापालिकेने म्हैसूर कार्बोलिक साबण खरेदीत केलेला गैरव्यवहार

(५२) * ४४६९ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.हरिसिंग राठोड, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने म्हैसूर कार्बोलिक साबण खरेदीत दहा लाख रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तृतीयश्रेणी व चतुर्थश्रेणी कामगार सेवकांना नियमावलीनुसार साबण देणे आवश्यक आहे.

सन २०१४-१५ या वर्षाकरिता जुलै, २०१४ मध्ये १२० ग्रॅमचा लाईफबॉय साबण खरेदीसाठी मागविलेल्या निविदेमध्ये रुपये २२.८० या दराची मे. नमन एंटरप्रायजेस यांची एकच निविदा प्राप्त झाल्याने, निकोप स्पर्धा नसल्याने स्थायी समितीने सदर निविदा रद्द केली.

तद्नंतर ऑगस्ट, २०१४ मध्ये नव्याने निविदा काढताना निविदेत लाईफबॉय / संतूर/ डेटॉल / लक्स या ब्रॅण्डचा उल्लेख करण्यात आला. या निविदेमध्ये देखील फक्त लाईफबॉय साबणासाठी रुपये २२.५० या दराची मे. नमन एंटरप्रायजेस यांची एकच निविदा आल्याने सदर निविदेस ८ दिवसांची मुदतवाढ देण्यात आली.

सदर वाढीव मुदतीत लाईफबॉय या ब्रँडसाठी अपर्णा एंटरप्रायजेस यांची रुपये २१.८७ प्रती नग या दराची आणि निविदेमधील चार ब्रँड व्यतिरिक्त म्हैसूर कार्बोलिक (वजन १५० ग्रॅम) या ब्रँडसाठी मे. सूर्या एंटरप्रायजेस यांची रुपये १९.६० प्रती नग या दराची निविदा प्राप्त झाली.

एकंदरीत ३ प्राप्त निविदांपैकी मे. सूर्या एंटरप्रायजेस यांची निविदा न्युनतम दराची असल्याने व म्हैसूर कार्बोलिक साबणाचा दर्जा लाईफबॉय सारखाच असल्याने त्यांच्या समवेत दिलेल्या दरात वाटाघाटी करुन रुपये १८.०० एवढा दर निश्चित करण्यात येऊन, सदर निविदा स्थायी समितीसमोर मान्यतेकरीता ठेवण्यात आली. याबाबत समितीने चर्चेअंती मे. सुर्या एंटरप्रायजेस यांची निविदा मान्य करुन त्यांना ३, ९६, ००० नग खरेदी करण्यासाठी दिनांक १३.२.२०१५ रोजी कार्यादेश दिला आहे.

(२), (३) व (४) उपरोक्त १) येथील वस्तुस्थिती विचारात घेता प्रश्न उद्भवत नाही.

पुण्यातील वाहतुकीच्या प्रश्नाबाबत

(५३) * ३२९७ श्री.अनंत गाडगीळ, डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील चौकांमधील वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला आहे वाहतुक पोलीसांनी चौकात थांबून वाहतूक नियंत्रण करावी असे आदेश कोर्टाने दिले असताना देखील दंड वसूली करता एकाच ठिकाणी १०-१२ पोलीस व १-२ अधिकारी कोंडाळे करुन उभे असतात असे दृष्य पुण्यात वारंवार बघायला मिळते, दंड वसुलीच्या कामापेक्षा वाहतूक सुरक्षित करण्याकडे लक्ष देण्याची गरज असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन याबाबतीत काय धोरण ठरविणार आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशिल काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) पुणे शहर व परिसरातील वाहतूक नियमनाचे काम वाहतूक शाखेतील अधिकारी व कर्मचारी हे नेमून दिलेल्या कार्य विभागणीनुसार करतात. वाहतूक शाखेकडून अनेक विशेष मोहिमा राबविल्या जातात. यावेळी एकाच ठिकाणी बरेचसे अधिकारी/कर्मचारी नेमलेले असतात. अशावेळी अधिकारी/कर्मचारी एकत्र आलेले दिसतात. वाहतूक शाखेकडील अधिकारी व कर्मचारी यांना कर्तव्याशिवाय एकत्र चौकामध्ये न थांबवण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. एकत्रित थांबलेले आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

नामपुर (ता.बागलाण, जि.नाशिक) येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करणेबाबत

(५४) * ५२८७ डॉ.अपूर्व हिरे : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नामपुर शहर (ता.बागलाण, जि.नाशिक) परिसरात चो-या व गुन्हेगारीत झालेली वाढ तसेच अपु-या पोलीस बलामुळे गुन्ह्याच्या तपासात झालेली घट विचारात घेता नामपुर येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याची मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात आल्याचे दिनांक १ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ४२ खेड्यांचे मध्यवर्ती व्यापारी केंद्र म्हणून ओळख असलेल्या नामपुर शहरातील वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याच्या अनुषंगाने तसेच गतकाळात विविध गुन्हे घडून लाखोंचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केल्याच्या पार्श्वभुमीवर नामपुर येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करणेसंदर्भात शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(३) नामपुर येथे स्वतंत्र पोलीस ठाणे मंजुर करुन पोलीसांची संख्या वाढविणेबाबत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नसल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय आहे व सदरहु निर्णय केव्हापर्यंत घेणे अपेक्षित आहे ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) मार्च २०१५ मध्ये यासंदर्भातील निवेदन शासनाकडे प्राप्त झाले आहे. सदर निवेदनावर पोलीस महासंचालक, मुंबई यांच्याकडून दि. ३१.३.२०१५ च्या पत्रान्वये अभिप्राय मागविण्यात आले आहेत.

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अभिप्राय प्राप्त होताच शासन स्तरावर निर्णय घेण्यात येईल.

धारावी, (मुंबई) येथील स्कायवाकचे काम मंजूर होऊन काम अद्याप पूर्ण करण्यात आले नसल्याबाबत

(५५) * ६३९४ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धारावी, मुंबई येथील स्कायवाकचे काम मंजूर होऊन पूर्ण करण्यात आले नसल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना वारंवार लेखी निवेदन देऊनही अद्यापही हे काम पूर्ण करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू स्कायवाकचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत तसेच या कामास दिरंगाई करणाऱ्या दोषी अधिकारी वा कर्मचारी यांचेवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीही कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) हे खरे नाही.

म्हाडा प्राधिकरणास दि. ०१.१०.२०१२ रोजी मंजूर केलेल्या रु.१४.१२ कोटीच्या निधीतून स्कायवॉकच्या कामाची निविदा मागवून यशस्वी कंत्राटदारास त्या कामाचे दि. ०१.०३.२०१४ रोजी म्हाडाद्वारे कार्यादेश देण्यात आले. हे काम प्रगतीपथावर असून ८० टक्के काम भौतिकदृष्टया पूर्ण झाले आहे व उर्वरीत काम माहे मे, २०१५ अखेरीस पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील सांताक्रुझ-कालिना सीएसटी रोडवर बेकायदा हॉटेल व बेकायदा कार पार्किंगमुळे नागरिकांना अडथळा निर्माण होत असल्याबाबत

(५६) * ६०२४ श्री.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील सांताक्रुझ-कालिना सीएसटी रोडवर बेकायदा हॉटेल व बेकायदा कार पार्किंगमुळे नागरिकांना अडथळा निर्माण होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर परिसरातील बेकायदा हॉटेल व बेकायदा कार पार्किंगवर तात्काळ कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) व (२) बीकेसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत सांताक्रुझ कलिना सीएसटी रोडवर बेकायदा एकही हॉटेल नाही. परंतु या रोडवर बेकायदा कार पार्कींगमुळे नागरिकांना अडथळा निर्माण होत आहे. बेकायदा हॉटेल व कार पार्किंगच्या संदर्भात कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

(३) बेकायदा कार पार्कींग करणाऱ्यांविरोधात सन २०१४ मध्ये बीकेसी पोलीस ठाणे येथे एकूण ४६ वाहनधारकांवर तसेच वाहतूकीस अडथळा निर्माण करणाऱ्या एकूण ८९ हॉकर्सवर कारवाई करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या गुन्हा करणाऱ्यांवर पोलीसांमार्फत सतत लक्ष ठेवून कारवाई करण्यात येत असते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील देवनार पोलीस ठाण्याची झालेली दुरवस्था

(५७) * ४३१२ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील देवनार पोलीस ठाण्याची अत्यंत दुरवस्था झाली असून ठाण्यातील छताचे प्लास्टर सतत कोसळत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पोलीस ठाण्याच्या दुरुस्तीकडे वारंवार तक्रार करुनही दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पशुवधगृहाच्या परिसरात देवनार पोलीस स्टेशन कार्यरत असून पोलीस स्टेशनच्या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी अंदाजपत्रक महानगरपालिकेकडून तयार करण्यात आले असून महानगरपालिकेकडून इमारतीच्या दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. तसेच देवनार पशुवधगृहाच्या आधुनिक पध्दतीने पुर्नबांधणीच्या वेळी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून पोलीस ठाण्यासाठी नविन इमारत बांधण्याचे प्रस्तावित करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मिरा-भाईंदर शहरातील बीएसयूपी घोटाळा चौकशी करणेबाबत

(५८) * ५७८८ श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने गोरगरीब झोपडपट्टीधारकांना हक्काचे घर मिळावे यासाठी बेसिक सर्व्हिसेस फॉर अर्बन पूअर (बीएसयूपी) योजनेतून मिरा-भाईंदर शहरातील जनता नगर आणि कासे चर्च झोपडपट्टीत ४ हजार १६३ घरे उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नोव्हेंबर, २००८ मध्ये वा त्यादरम्यान मंजूर झालेल्या मिरा-भाईंदर महापालिकेच्या बीएसयुपी योजनेचे काम तब्बल पाच वर्षे विलंबानंतर सुरू होत आहे, मात्र ठेकेदाराला जुन्याच दराने काम करण्यास भाग पाडण्यात आले असल्याने गोरगरीब झोपडपट्टीवासीयांना निकृष्ट दर्जाचे घरे देण्याची शक्यता व्यक्त केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मिरा-भाईंदर बीएसयूपी घोटाळा प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप, उक्त प्रश्नाबाबत कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) केंद्र शासनाने दि.१३.११.२०१४ च्या पत्रान्वये मिरा-भाईंदर महानगरपालिकेकरिता शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविणे या उपअभियानांतर्गत मंजूर ४१३६ घरकुलांचा सदर प्रकल्प १०८१ घरकुलांपर्यंत सिमित केलेला आहे.

(२) प्रस्तुत प्रकल्पासाठी शासकीय जमीन मिळण्यास लागलेला कालावधी, प्रकल्पासाठी पर्यावरण विभागाची मान्यता घेण्यासाठी लागलेला कालावधी, प्रकल्पाच्या जमीनीवरील आरक्षण बदलासाठी शासनाची मान्यता घेण्यासाठी लागलेला कालावधी, प्रकल्पातील लाभार्थ्यांचा योजनेस असलेला विरोध, इ. कारणांमुळे प्रकल्प सुरु होण्यासाठी उशीर झालेला आहे.

सदर प्रकल्पासाठी पॅकेजनिहाय ठेकेदार नियुक्त केले असून सदर ठेकेदारांना (Turnkey) ठोक पध्दतीने कंत्राट देण्यात आले आहे. सदर बांधकामाचा दर्जा तपासण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली असून वेळोवेळी बांधकामाचा दर्जा तपासण्यात येत आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

गोराई येथील २ हेक्टरचा भूखंड लाटण्यासाठी अधिकारी व बिल्डरने केलेला गैरव्यवहार

(५९) * ४५५० श्री.जगन्नाथ शिंदे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोराई - ३ येथील क्लस्टर क्रमांक २८४ ते २९६ या भूखंडासाठी म्हाडाने १९९४ मध्ये सोडत काढून लाभार्थ्यांकडून २५ टक्के रक्कम भरुनही घेतली तद्नंतर लाभार्थ्यांनी उर्वरित ७५ टक्के रक्कम भरुन सोसायटी स्थापन करुन बांधकाम करणे क्रम प्राप्त होते परंतु या भूखंडाला सीआरझेड कायद्याची अडचण निर्माण झाली लाभार्थ्यांना भूखंडाचा ताबा देण्याची प्रक्रिया रखडल्यामुळे २० वर्ष हा भूखंड विनावापर पडून राहिला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोराई येथील सदरहू मोक्याच्या ठिकाणी २ हेक्टरचा भूखंड बिल्डरच्या ताब्यात देण्यासाठी अधिकाऱ्यांनी संगनमताने लाभार्थ्यांच्या बोगस सोसायटी, बोगस संमतीपत्र व अन्य बोगस कागदपत्रांच्या आधारे अवघ्या १० दिवसांत दिनांक ३ जानेवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास प्रस्तावाला मंजूरी देवून त्यानंतर काही दिवसातच बिल्डरला संमतीपत्रही देण्याचा गैरप्रकार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

श्री. प्रकाश मेहता : (१) अंशत: खरे आहे.

सदर भूखंडाचा विकास सीआरझेड कायद्यामुळे मागील २० वर्षापासून रखडलेला आहे. मा.उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र. ३२४०/२००४ मध्ये दि. ०६.१०.२००५ रोजी दिलेल्या आदेशानुसार कांदळवनापासून ५० मी. अंतरापर्यंत असलेल्या भूखंडाच्या विकासास स्थगिती दिली. सदरचे भूखंड हे कांदळवनापासून ५० मी. अंतरापर्यंत असल्याने उपरोक्त वसाहतीचा पुनर्विकास रखडला आहे.

(२), (३) व (४) सदर अभिन्यासामध्ये क्लस्टर क्र. २८४ ते २९६ या एकत्रित भूखंडाचे क्षेत्र १५५८०.०३ चौ.मी. इतके असून सदर भूखंडास संलग्न असलेल्या मात्र सी.आर.झेड क्षेत्राच्या बाहेर असलेल्या करमणूकीच्या भूखंडाचे सबस्टेशनसहीत क्षेत्र ११२५९.३३ चौ.मी.इतके आहे. सदर दोन्ही भूखंडाची अदलाबदल करुन रखडलेला पुनर्विकास करण्याबाबत म्हाडा भूखंड लाभार्थी कल्याण संघ या संबंधीत संस्थेने म्हाडाकडे त्यांच्या आर्कीटेक मार्फत प्रस्ताव सादर केला होता. असे केल्यास संकूलातील २० वर्षापासून विकासास वंचित असलेल्या ३६७ लाभार्थ्यांना घरे उपलब्ध होतील, तसेच म्हाडाससुध्दा विनामूल्य घरे उपलब्ध होतील या बाबी विचारात घेऊन म्हाडाने त्यांच्या दि. ०७.०१.२०१५ च्या पत्रान्वये सदर संस्थेस काही अटी व शर्ती नमूद करुन केवळ प्राथमिक इरादापत्र (Letter of Intent) दिलेले आहे, असे म्हाडाने त्यांच्या अहवालात नमूद केले आहे.

त्यानुसार सदर संस्थेस आवश्यक अटी व शर्तींची पूर्तता करणे, महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेण्ट ऑथोरिटी (MCZMA) मिनिस्ट्री ऑफ एनव्हॉर्नमेण्ट फॉरेस्ट ॲण्ड क्लायमेट चेंट (MOEF), बृहन्मुंबई महानगरपालिका व इतर आवश्यक सर्व विभागांकडून मंजुऱ्या प्राप्त करणे, सुधारित अभिन्यास मंजूर करणे इत्यादी बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. सदर सर्व अटी व शर्तींची पुर्तता केल्यानंतर सदर संस्थेस म्हाडाकडून अंतिम देकारपत्र जारी करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच मा.मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये होणारा अंतिम निर्णय संस्थेस बंधनकारक राहील अशी ही अट म्हाडाने प्राथमिक इरादापत्रात नमूद केली आहे.

असे असले तरी सी.आर.झेड मुळे बाधीत असलेल्या म्हाडाच्या विविध भूखंडांवर गृहनिर्माण प्रकल्प राबविण्यासाठी मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या दि.०६.०१.२००५ च्या स्थगिती आदेशामधून सूट मिळण्यासाठी जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये म्हाडाने नोटीस ऑफ मोशन क्र. ७४३/२०१४ मा.मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेला आहे. त्यामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाने दि. ०९.०३.२०१५ रोजी अंतरिम आदेश दिले असून त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने सी.आर.झेड अधिसुचना दि. ०२.०१.२०११ मध्ये नमुद अट क्र. १ (कांदळवनाचे क्षेत्र)

१००० चौ.मी.पेक्षा जास्त आहे किंवा कसे व मुद्दा क्र. २ (सदर भूखंड कांदळवनापासून ५० चौ.मी. च्या आत आहे किंवा कसे) या अटीच्या आधारे म्हाडाच्या संबंधीत भूखंडांचे सर्वेक्षण करुन तसा अहवाल मा.मुंबई उच्च न्यायालयासमोर ४ आठवडयात सादर करावा, असे निर्देश दिले आहेत. सबब सदर अहवाल मा.मुंबई उच्च न्यायालयात बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून सादर झाल्यानंतर गोराई येथील वर नमूद सी.आर.झेड बाधीत भूखंडावर राबविण्याच्या प्रकल्पाबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाचे पुढील आदेशानुसार कार्यवाही करावी अशा सुचना शासनाकडून म्हाडास देण्यात येतील.

नाशिक शहरातील काझीगढी पावसाळ्यात कोसळत असल्याबाबत

(६०) * ४८३९ श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अनिल भोसले, श्री.हेमंत टकले : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहरातील काझीगढी प्रत्येक पावसाळ्यात कोसळत असल्यामुळे आगामी पावसाळ्यात येणा-या सिंहस्थ कुंभमेळ्यामध्ये सदर गढी कोसळून दुर्घटना टाळण्यासाठी या गढीला संरक्षण भिंत बांधण्याची लोकप्रतिनिधींनी दिनांक ६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक महानगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याने सदरचे कामासाठी शासनाकडून निधी दिला जावा अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केलेली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१), (२) व (३) अशा आशयाचे निवदेन जलसंपदा विभाग, विभागीय आयुक्त नाशिक आणि जिल्हाधिकारी नाशिक यांना प्राप्त झाले आहे.

सदर कामाच्या अनुषंगाने उक्त जागेचे सर्वेक्षण करणे, आर.सी.सी. संकल्पनासाठी तांत्रिक सल्लागार नेमणे इत्यादी कामांसाठी नाशिक महानगरपालिकेने रुपये १६.२५ लक्ष इतका निधी जलसंपदा विभागास दिनांक २७ फेब्रुवारी, २०१५ रोजी उपलब्ध करुन दिला आहे.

या बाबतची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर संरक्षण भिंत बांधण्यासाठी आयुक्त, नाशिक महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबईतील गोराई येथील डंम्पिंग ग्राऊंड बाबत इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग ॲन्ड फायनान्शीयल सर्व्हिस कंपनीला नियमबाह्य रित्या देयके अदा केल्याबाबत

(६१) * ५२२५ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोराई येथील डंम्पिंग ग्राऊंड शास्त्रोक्त पध्दतीने बंद करुन कचऱ्यापासून मिळणारे कार्बन क्रेडीट अपेक्षित प्रमाणात मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कचऱ्यातील प्रदुषण कमी करुन कार्बन क्रेडीट मिळवण्याच्या सल्ल्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग ॲन्ड फायनान्शीयल सर्व्हिस कंपनीची सन २००८ मध्ये मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्ती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीला नियमबाहय पध्दतीने १ कोटी १९ लाख रुपये माहे ऑक्टोबर, २००९ मध्ये वा त्यादरम्यान अदा करण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबतीत महालेखापरीक्षकांनी (कॅग) त्याबाबतीत आक्षेप नोंदविलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. देवेंद्र फडणवीस : (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) क्षेपणभूमी शास्त्रोक्त पध्दतीने बंद केल्यानंतर तयार होणाऱ्या अंदाजित वायूनिर्मितीच्या आधारावर सल्लागाराने प्रकल्पातून अंदाजिलेल्या प्रमाणित उत्सर्जित घट (Ceritifed Emission Reduction) पैक जुलै २००९ ते डिसेंबर २०१४ या कालावधीतील ४,२६,०२४ CERs च्या खरेदीसाठी दिनांक २६.०२.२००९ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिका व एशियन डेव्हलपमेन्ट बँक (ADB) यांच्यात उत्सर्जित घट खरेदी करार (ईमिशन रिडक्शन परचेस ऍग्रीमेन्ट) करण्यात आला. त्यास महानगरपालिकेच्या स्थायी समिती क्र. १३१, दिनांक १८.०५.२००९ नुसार मंजूरी देण्यात आली होती. सदर करारानुसार महानगरपालिकेस एशियन डेव्हलपमेन्ट बँके कडून रु. २४,५१,३९,८६५/- इतकी अग्रीम रक्कम दिनांक ०५.१०.२००९ रोजी प्राप्त झाली. बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दिनांक ०८.१०.२००९ रोजी सल्लागार मे. इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग ॲन्ड फायनान्शीयल सर्व्हिस यांना कंत्राटातील अटी व शर्तीनुसार एशियन डेव्हलपमेन्ट बँक कडून प्रमाणित उत्सर्जित घट खरेदी करारान्वये मिळालेल्या रक्कमेच्या ५ टक्के म्हणजेच रु. १,२२,५६,९९३/- सल्लागार शुल्क म्हणून देण्यात आले.

(४) सल्लागाराला केलेल्या अधिदानाबाबतचा मसुदा उतारा लेखापरिक्षण अहवालामध्ये समाविष्ट करण्यासंबंधीचे पत्र प्रधान महालेखाकारांकडून दिनांक १७.०६.२०१३ रोजी महापालिकेस प्राप्त झाले होते. सदर पत्रास महानगरपालिकेतर्फे दिनांक १९.१२.२०१३ रोजी उत्तर पाठविण्यात आले होते. सल्लागारांकडून अधिदानाचा परतावा करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत असल्यामुळे सदर मसुदा उतारा लेखापरिक्षण अहवालातून वगळण्याची विनंती महालेखाकारांना करण्यात आली होती.

(५) महानगरपालिकेने सल्लागार मे. इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग ॲन्ड फायनान्शीयल सर्व्हिस यांना देण्यात आलेल्या अधिदानाचा परतावा करण्याबाबत मे. इन्फ्रास्ट्रक्चर लिजींग ॲन्ड फायनान्शीयल सर्व्हिस यांच्याशी महानगरपालिकेने पत्रव्यवहार केला होता. परंतु सल्लागार मे. इन्फ्रास्टक्चर लिजींग ॲन्ड फायनान्शीयल सर्व्हिस यांनी सदर अधिदानाच्या परताव्याबाबत कंत्राटातील खंड क्रमांक - १३ तंटा निवारण नुसार तंटा निवारण समिती स्थापन करण्याची विनंती केली होती. कंत्राटातील अटी व शर्तीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त (शहर) यांच्या मान्यतेने तंटा निवारण समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीद्वारे अधिदानाच्या परताव्यासंबंधी कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

आंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील "स्वराज नेप्च्युन" या संकुलनाच्या विकासकाने रहिवाशांना पायाभूत सुविधांपासून वंचित ठेवल्याबाबत

(६२) * ६५९९ प्रा.जोगेन्द्र कवाडे : सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबिवली (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील "स्वराज नेप्च्युन" या संकुलनाच्या विकासकाने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान उक्त संकुलनातील घरांचा ताबा संबंधित ग्राहकांना दिला परंतु सदरील संकुलनात पाणी उपलब्ध नसून टँकरने पाणी मागवावे लागत असून येथील सदनिकाधारक इतर सोई-सुविधांपासून सुध्दा वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ज्या सदनिकाधारकांचे एक वा दोन हप्ते जरी विकासकाला भरावयाचे थकले तरी सदरील विकासक त्या सदनिकांधारकांना तुमची सदनिका रद्द करण्यात आली असून तुम्ही भरलेले पैसे परत घेवून जा अशी नोटीस पाठवितो व संबंधित ग्राहकाला पैसे परत करुनही सदनिका दुसऱ्या ग्राहकांना चढया दराने विकत असल्याचेही निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार संबंधित संकुलनाला सर्व सोईसुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच संबंधित विकासकावर पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. प्रकाश मेहता : (१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील आंबिवली येथील "स्वराज" या गृहप्रकल्पाकरिता संबंधित विकासकाने नियमानुसार नळजोडणी घेतलेली नसल्याने तसेच महानगरपालिकेकडे बांधकाम पूर्णत्वाचा दाखला सादर केलेला नसल्याने अद्याप बांधकाम पूर्णत्वाचा दाखला प्रदान करण्यात आलेला नाही. त्यामुळे महानगरपालिकेमार्फत पाणी पुरवठा केला जात नाही.

(२), (३) व (४) सदनिकाधारक यांनी विकासकासोबत झालेल्या आर्थिक तक्रारी महापालिकेस प्राप्त झालेल्या आहेत. सद्यःस्थितीत विकासकांविरुध्दच्या तक्रारींसाठी सदनिकाधारकांनी न्यायालयात जाणे, हाच पर्याय उपलब्ध आहे.

विकासकाने रेखांकन मंजूरीमधील सुविधा क्षेत्र ८१५०.०० चौरस मीटर व ४३१.५० चौरस मीटर आरक्षण क्र. ८ एम.एस.ई.बी. ६१८०.०० चौरस मीटर आ.क्र. ४७ कचरा डेपो ४०८०.०० चौरस मीटर, आरक्षण क्र. ४३ भाजी मार्केट- ८३०.०० चौरस मीटर, आरक्षण क्र.४४ शॉपिंग सेंटर - ५७५.०० चौरस मीटर असे एकत्रित १९८१५. ३९ चौरस मीटर क्षेत्र महापालिकेस हस्तांतरित केलेले नाही.

वारंवार सुचना देऊनही विकासकाने एकूण १९८१५.३९ चौरस मीटर इतके सुविधा क्षेत्र व ४३४.५० चौरस मीटर आरक्षणाचे क्षेत्र रितसर महापालिकेच्या ताब्यात देईपर्यंत विकासकाच्या एकूण ३७ इमारतीचे बांधकामास स्थगिती देण्यात आलेली आहे.

विधान भवन :
मुंबई.

उत्तमसिंग चव्हाण
सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.